कृषीवल
रायगड, शुक्रवार, दि. २९ नोव्हेंबर २०२४
किंमत ४ ₹

## अधिवेशनाचा पहिला आठवडा वादळी

**नवी दिल्ली :** संसदेच्या अधिवेशनात पहिला आठवडा वादळी ठरला आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांनी अदानीच्या मुद्द्यावरुन दोन्ही सभागृहात गदारोळ केला. त्यामुळे कामकाज तहकूब करण्यात आले, त्यानंतर दुसऱ्या दिवशी सारखीच परिस्थिती पाहायला मिळाली. संसदेच्या दोन्ही सभागृहात झालेल्या गदारोळामुळे गुरुवारीही कामकाज होऊ शकले नाही. दोन्ही सभागृहांच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी वारंवार विनंती करूनही गोंधळ आणि घोषणाबाजी कमी झाली नाही. त्यामुळे गुरुवारी सकाळी ११ वाजेपर्यंत दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब करण्यात आले.


HIRING ALERT
Looking For South Indian Cook
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010151284 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com& Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

# सुनावणी पुन्हा लांबणीवर

## सेझग्रस्त शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त; सरकारवर नाराजी व्यक्त

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

८०० पेक्षा अधिक महामुंबई सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याच्या प्रकरणावरील २७ नोव्हेंबरची सुनावणी विधानसभा निवडणुकीचे कारण पुढे करीत १८ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाने शेतकऱ्यांना पुन्हा एकदा तारीख दिली आहे.



> महामुंबई सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याच्या प्रकरणावरील सुनावणी पुढे जात आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकार गंभीर नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. यासंदर्भात लवकरात लवकर सुनावणी घ्यावी.
> – ॲड. दत्तात्रेय नवाळे, विधी सल्लागार, महामुंबई संघर्ष समिती

उच्च न्यायालयाने सहा आठवड्यांत सुनावणी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. ही मुदतही संपुष्टात आली आहे. त्यानंतरही विविध कारणे देत जिल्हाधिकारी यांच्याकडून सातत्याने तारीख पे तारीख दिली जात आहे. जिल्ह्यातील सुमारे ८५० सेझग्रस्त शेतकऱ्यांना सुनावणीची प्रतीक्षा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार गंभीर नसल्याचे बोलले जात आहे. परिणामी, शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महामुंबई सेझसाठी उरण, पेण आणि पनवेलमधील शेतकऱ्यांच्या खरेदी करण्यात आलेल्या जमिनी परत करण्याच्या निर्णयाची सुनावणी बुधवारी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात होणार होती. मात्र, जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी १८ डिसेंबरला सुनावणी होणार असल्याचे सांगितले आहे. ही माहिती महामुंबई संघर्ष समितीचे विधी सल्लागार ॲड. दत्तात्रेय नवाळे यांनी दिली असून, सरकारकडून चालढकलपणा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# डिझेल तस्करी जोमात प्रशासन कोमात

> डिझेल परतावा वेळेवर मिळणे गरजेचे असताना शासनाकडून तो वेळेवर मिळत नाही. त्यामुळे मच्छिमारांवर मोठी आर्थिक संकट आले आहे. जिल्ह्यात काही भागांमध्ये डिझेलची तस्करी होत असल्याची माहिती समोर येत आहे. जिल्ह्यातील बोटींचा यामध्ये सहभाग असल्यास त्यांच्याविरोधात कारवाई व्हावी, याचा प्रयत्न केला जाईल.
> – विजय गिदी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबई

**। अलिबाग । कृषीवल टीम ।**

अंजनवेल समुद्रकिनारी चालणाऱ्या डिझेल तस्करीविरोधात रत्नागिरीच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने कारवाई करीत नऊ जणांना ताब्यात घेतले. या डिझेल तस्करीचे कनेक्शन रायगड जिल्ह्याशी असल्याची माहिती समोर येत आहे. राजकीय वरदहस्तामुळे रायगड जिल्ह्यातील मांडवा, रेवदंडा व इतर बंदरांवर डिझेल तस्करी करणाऱ्यांचे फावले आहे. अनेकदा समुद्र मार्गाचा वापर करुन दहशतवादी हल्ले झाले असतानाही रायगड जिल्ह्याच्या सुरक्षेकडे कानाडोळा का केला जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. पान २ वर

### सागरी किनाऱ्यांची सुरक्षा धोक्यात

### रायगडसह डिझेलमाफियांचे रत्नागिरीतही धंदे तेजीत

### सात लाखांचे डिझेल जप्त

रायगड पोलिसांनी जानेवारीपासून गेली आठ महिन्यांपर्यंत डिझेल तस्करीवर कारवाई केली. या कारवाईत आठ हजार २५० रुपयांचा डिझेल जप्त करण्यात आला, त्याची किंमत सहा लाख ८७ हजार इतकी आहे. त्यात दोन बोटी जप्त केल्या असून, त्यांची किंमत २५ लाख रुपये आहे. या कारवाईत डिझेलसह एकूण ३१ लाख ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून देण्यात आली.

### रेवदंड्यातून जाणाऱ्या डिझेलवर पनवेल पोलिसांची कारवाई

जिल्ह्यातील समुद्रात कमी किमतीत डिझेल विकला जातो. एक मोठे बार्ज अथवा मासेमारी बोटीचा आधार घेत रात्रीच्यावेळी डिझेलची तस्करी खुलेआमपणे होत आहे. रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या पुलाजवळ मागील काही महिन्यांपूर्वी डिझेल तस्करी रात्रीच्यावेळी करण्यात आली. पोलीस ठाण्यापासून पाचशे मीटर अंतरावर दोन टँकर उभे केले जात होते. डिझेल भरून झाल्यावर ते टँकर रस्त्याने रात्रीच्यावेळी जात होते. परंतु, पनवेल पोलिसांनी महामार्गावर छापा टाकून डिझेलची वाहतूक करणाऱ्या टँकरवर कारवाई केल्याची माहितीही समोर येत आहे.





रायगडसह आता डिझेलचे कनेक्शन रत्नागिरीसोबत असल्याचे उघड झाल्याने किनाऱ्यांवरील सुरक्षा पुन्हा एकदा धोक्यात आली आहे. राजकीय वदरहस्त आणि पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे डिझेलमाफियांचा धंदा खुलेआम सुरू असल्याची चर्चा आहे.

# जनमतावर डाका टाकला : नाना पटोले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्रात झालेल्या मतदानाच्या टक्केवारीत फरक जाणवतो आहे. जवळपास ७६ लाख मतदान वाढलं आहे. मग मतदानाची ही वाढ कशी झाली? त्यामुळे आयोगाच्या पारदर्शकेतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. जनतेची मते चोरण्याचे आणि डाका टाकण्याचे काम आयोगाने केल्याचा आरोप गुरुवारी (दि. २८) काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. याविरोधात आमचे आमदार आणि उमेदवार कोर्टात जाणार आहेत, असे पटोले यांनी यावेळी सांगितले.

पटोले म्हणाले की, ७.८७ टक्क्यांनी मतदानात वाढ झाली आहे. ७६ लाख मते संध्याकाळी पाच-सहाच्या दरम्यान पडलेली आहेत, याची कोणतीही माहिती निवडणूक आयोगाकडे नाही. महाराष्ट्रात पाच लाखांहून अधिक मतं आली, मग ती आली कुठून? असा सवालही त्यांनी केला. आता आम्हाला जे सांगितलं जातं की रात्री साडेअकरा वाजेपर्यंत मतदान झालं. मग कमीत कमी दोन ते तीन किलोमीटरच्या मतदारांच्या रांगा असतील. मग निवडणुका पारदर्शक घेण्यासाठी निवडणूक आयोग फोटो, व्हिडीओ वैगेरे काढत असतं. मग निवडणूक आयोगाने आम्हाला रात्री मतदारांच्या रांगा लागल्या होत्या की नाही, म्हणजे संध्याकाळपर्यंत मतदानाची आकडेवारी ५८.२२ टक्के होत असेल तर मग असं काय झालं की रात्री साडेअकरा वाजेपर्यंत मतदान झालं?, असा सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला.

> महाराष्ट्र ताब्यात घेण्याचे २०२० ला भाजपचे ठरले होते. पक्ष फोडले, चिन्ह घेतले, न्यायव्यवस्था हाती घेतली. सर्व बेकायदेशीर असून, सर्वोच्च न्यायालय लक्ष द्यायला तयार नाही. असेच सर्व सुरु राहिल्यावर राजकारणात राहायचं कशाला?
> – नाना पटोल, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

सात वाजता मतदान झाल्यानंतर त्याचा रिपोर्ट उशिरा देण्यात आला. निवडणूक आयोगाने सायंकाळी ५ वाजता ५८.२२ टक्के मतदानाची टक्केवारी दिली. परंतु, ६२.२ टक्के मतदान झाल्याचे त्यांनी रात्री ११.३० वाजता सांगितले. यावरून साडेसहा तासांमध्ये मतदान करुन घेतल्याचे समोर येते. तर, दुसऱ्या दिवशी पान २ वर

**आजचा अग्रलेख**
शिंद्यांची सुटका...

## वेधक

### मोदींना जीवे मारण्याची धमकी

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जीवे मारण्याची धमकी देणारा फोन आल्याने एकच खळबळ उडाली. मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला फोन करून सदर महिलेने मोदींच्या हत्येची योजना आखल्याचा दावा केला. हत्येसाठी हत्यारांची व्यवस्थाही आधीच करण्यात आल्याचे महिलेने सांगितले. आंबोली पोलिसांनी तात्काळ महिलेला अटक केली आहे. महिलेची चौकशी केल्यानंतर तसेच तिची पार्श्वभूमी तपासल्यानंतर काहीच संशयास्पद कनेक्शन आढळून आलेले नाही.

### एनडी स्टुडिओ सरकारच्या ताब्यात

**मुंबई :** ज्येष्ठ कला दिग्दर्शक नितीन देसाई यांचा एनडी स्टुडिओ सरकारच्या ताब्यात गेला आहे. सांस्कृतिक विभागाच्या सचिवांनी स्टुडिओची पाहणी केली आहे. कर्जबाजारी झालेल्या देसाई यांच्या स्टुडिओवर अनेक कंपन्यांचं कर्ज होतं. मागच्या वर्षी वयाच्या ५७ व्या वर्षी देसाई यांनी त्यांच्या स्टुडिओमध्ये आत्महत्या केली होती. स्टुडिओवर असलेले कर्ज म्हणून त्यांनी हे पाऊल उचलल्याचे सांगण्यात आले होते. बॉलीवूडमधील प्रसिद्ध कलादिग्दर्शक म्हणून जागतिक पातळीवर देसाई यांनी त्यांच्या नावाची वेगळी ओळख चाहत्यांच्या मनात तयार केली होती.

# खाऊगल्लीमुळे आजाराला निमंत्रण



**अन्न भेसळ खात्याचे दुर्लक्ष**

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेणमध्ये अवैध खाऊच्या गाड्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. नगरपालिका मैदानाच्या रस्त्यावर तर एवढ्या गाड्या लागलेल्या आहेत की, त्या रस्त्याला पोराटोरांनी खाऊ गल्ली म्हणूनच संबोधायला सुरूवात केली आहे. साधारणतः या रस्त्याला २५ ते ३० खाऊच्या गाड्या वेगवेगळे पदार्थतयारकरताना दिसतात. सकाळ-संध्याकाळ या गाड्यांवर तोबा गर्दी पहायला मिळते. गर्दी जास्तीची असल्याने अस्वच्छता दिसून येते. बऱ्याच वेळेला नजरेस दिसणारी अस्वच्छता म्हणजे प्लेट, चमचे योग्य प्रकारे न धुता वारंवार धुण्यासाठी वापरलेल्या पाण्यातच विसळून घेतले जातात, ते योग्य प्रकारे स्वच्छ केले जात नाहीत. तसेच हे पदार्थ तयार करणारे व्यक्ती एवढे अस्वच्छ असतात, की त्यामुळेदेखील कळत-नकळत संसर्गजन्य आजार उद्‌भवू शकतात. एकंदरीत काय, पान २ वर

## वारकऱ्यांच्या टेम्पोला अपघात

**। रसायनी । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्यातील चौक वावंढळ येथील वारकरी कार्तिकी एकादशीनिमित्त आळंदी यात्रेसाठी गेले होते. तेथून ते टेम्पोने घरी परतत असताना संध्याकाळच्या सुमारास खोपोलीच्या इंदिरा चौकात टेम्पो चालकाचा ताबा सुटला आणि हा टेम्पो दुकानाच्या कठड्यावर आदळला. या अपघातात चौक वावंढळ येथील किसन पवार, शर्मिला शिंदे, कमल पवार, शारदा पालांडे असे चार वारकरी जखमी झाले. त्यांना खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर भारती दुर्गे, प्रमिला पवार, सीताबाई गायकवाड किरकोळ जखमी झाले आहेत.

# प्रियांका गांधींनी घेतली खासदारकीची शपथ



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी गुरुवारी (दि. २८) लोकसभेत खासदारकीची शपथ घेतली. केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत प्रियांका गांधी यांनी दणदणीत विजय मिळवला आहे. त्यानंतर त्यांनी गुरुवारी संसद सदस्य म्हणून शपथ घेतली. प्रियांका गांधी यांनी शपथ घेतली त्यावेळी त्यांचे बंधू लोकसभा विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी आणि आई काँग्रेस नेत्या सोनिया गांधी उपस्थित होत्या. तसेच प्रियांका गांधी यांचा मुलगा रेहान वाड्रा आणि मुलगी मिराया वाड्राही उपस्थित होती.

प्रियांका गांधी चार लाखांहून अधिक मतांनी विजयी झाल्या आहेत. हातात संविधान घेऊन त्यांनी खासदारकीची शपथ घेतली. प्रियांका या गांधी घराण्यातल्या चौथ्या महिला सदस्य म्हणून लोकसभेत पोहोचल्या आहेत. याआधी इंदिरा गांधी, सोनिया गांधी, मनेका गांधी या लोकसभेच्या खासदार राहिल्या आहेत.

## झारखंडमध्ये चौथ्यांदा सोरेन सरकार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवल्यानंतर झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांनी शुक्रवारी राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची चौथ्यांदा शपथ घेतली. रांचीमधील मोरहाबादी मैदानात झालेल्या या शपथविधीला इंडिया आघाडीचे वरिष्ठ नेतेही उपस्थित होते. यावेळी राज्यपाल संतोष गंगवार यांनी हेमंत सोरेन यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. शपथविधी सोहळ्याला उपस्थित असलेल्या इंडिया आघाडीच्या नेत्यांनी एकजुटीचं प्रदर्शन केलं. तसेच शपथ घेतल्यानंतर हेमंत सोरेन यांनी राज्याचा विकास आणि जनतेच्या हितामध्ये काम करण्याचा संकल्पही सोडला. हेमंत सोरेन झारखंडचे माजी पान २ वर

## मुंबई-बंगळुरु अंतर अवघ्या सहा तासांवर

# ग्रीन कॉरिडोरमुळे कोंडी फुटणार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सुमारे ३५०० कोटी रुपये खर्चून मुंबई-गोवा आणि मुंबई-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा २९ किलोमीटरचा जेएनपीए-पागोटे-चिरनेर ते चौकदरम्यान सहापदरी ग्रीन कॉरिडोर बांधण्यात येणार आहे. येत्या तीन वर्षांत त्याचे काम पूर्ण करण्यात येणार असून, रस्त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. तसेच मुंबई-बंगळुरु प्रवास सहा तासांवर येईल, असा दावा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातील सूत्रांनी केला.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६, ४८ आणि ३४८ या तीन महामार्गांसह ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटलसेतु, मुंबई-गोवा आणि गोवा-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गालाही जोडणार आहे. त्यामुळे मुंबई-बंगळूरु प्रवास सहा तासात करणे सहज शक्य होईल. असा अंदाज प्राधिकरणाने वर्तविला आहे. उरण-पागोटे ते चौकदरम्यानच्या या मार्गाची लांबी २९. २१९ कि.मी. आहे. या रस्त्यावर चिरनेर आणि आपट्यादरम्यान दोन बोगदेही उभारण्यात येणार आहेत. यात चिरनेर बोगदा १.९ कि.मी.चा, तर आपटा बोगदा १.७ किमीचा आहे. या टीन टनेलची लांबी ३.४७ कि.मी. आहे. या मार्गावर सहा मोठ्या आणि पाच लहान पुलांसह सर्व्हिस रोड, स्लीप रोडचा समावेश आहे.

> जेएनपीए-पागोटे-चौक या प्रस्तावित ग्रीन कॉरिडोरसाठी तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. लवकरच प्रकल्पाच्या कामासाठी निविदा मागविण्यात येणार आहेत. कार्यादेश दिल्यापासून ३० महिन्यांत हे काम पूर्ण करावे लागणार आहे. या रस्त्यामुळे या मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होणार आहे.
> – यशवंत घोटकर, उपसंचालक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण



### असा असेल मार्ग!

मुंबईच्या अटल सेतुवरून खाली उतरल्यानंतर मुंबई ते पुणे द्रुतगती महामार्गाला समांतर असा हा नवा महामार्ग असणार आहे. पुणे, सातारा, सांगली, बेळगाव असा हा मार्ग असेल. त्याचं ३०७ किलोमीटर अंतर महाराष्ट्रातून आणि ४९३ किलोमीटर अंतर कर्नाटकातून जाईल. या महामार्गामुळे मुंबईहून पुण्याला दीड तासात पोहोचता येईल, तिथून पुढे बंगळुरूला साडेचार ते पाच तासांत जाणं शक्य होईल.

# जेलिफिशमुळे मासेमारी धोक्यात

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

गेल्या १५ दिवसांपासून मुरुडच्या समुद्रात सुरू असलेली कोलंबी मासेमारी अचानक जेलिफिश आल्याने ठप्प झाली असल्याची माहिती एकदरा गावचे मच्छिमार नाखवा रोहन निशानदार यांनी दिली. बुधवारी कोलंबी मासेमारीस गेलेल्या येथील सुमारे २० नौका मोठ्या प्रमाणात जेलिफिश मिळाल्याने पान २ वर



### आरोग्यासाठी हानिकारक

जाळ्यात सापडलेली जेलिफिश साफ करुन समुद्रात फेकणे म्हणजे अत्यंत त्रासदायक आणि धोकादायक असते. याचा डोळ्यांना चुकून स्पर्श झाला तर दोन-तीन दिवस डोळ्यांचा दाह कमी होत नाही. शरीराला अन्य कुठेही स्पर्श झाला तरीही दाह होतो. किमान ४८ तास तरी दाह कमी होत नाही, अशी माहिती निशानदार यांनी दिली. ही मासळी कुणीही खात नाही. समुद्रात जेलिफिश कोलंबी मासळी सहजतेने फस्त करून फडशा पाडते.

# आंबा पिकावर ड्रोनद्वारे फवारणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**चढ-उतारावर असलेल्या कोकणातील आंबा बागांमध्ये औषध फवारणीत अनेक अडचणी येतात. सपाट जमीन नसल्याने यांत्रिकीकरणाचा उपयोग करता येत नाही. त्यामुळे रोगराई होऊन फळगळती, उत्पादनाचा दर्जा घसरण्याचे प्रकार घडतात. कोकणातील आंबा उत्पादकांना दिलासा मिळावा, यासाठी आरसीएफ कंपनीकडून आदिवासी महिलांना फवारणी ड्रोन देण्यात येणार आहेत.कृषी क्षेत्रात अत्याधुनिकता आणण्यासाठी आदिवासी शेतकऱ्यांना ड्रोन तंत्रज्ञानाद्वारे औषध फवारणीची माहिती दिली जात आहे. या उपक्रमाची सुरुवात आदिवासीबहुल जिल्ह्यातून होणार आहे.**

ड्रोन तंत्रज्ञानाद्वारे नॅनो युरिया, नॅनो डीएपी आणि अन्य सूक्ष्म पोषक खतांच्या फवारणीबरोबरच त्यांचा संतुलित वापर यासंबंधी महत्त्वपूर्ण माहिती देण्यात येत आहे. थळ येथील आरसीएफ कंपनी प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांचे लाभ लक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने ङ्गविकसित भारत संकल्प यात्राफ ही देशव्यापी मोहीम केंद्र सरकारकडून राबवण्यात येत आहे. या मोहिमेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गतवर्षी झारखंडम धील खुंटी जिल्ह्यात आदिवासी गौरव दिनाच्या औचित्याने करण्यात आले होते.

ड्रोन तंत्रज्ञानाचा उपयोग कोकणात अधिक किफायतशीर होणार असून आंबा बागायतींच्या फवारणीसाठी त्याचा वापर केला जाणार आहे. ही मोहीम भारत सरकारअंतर्गत येणाऱ्या विविध मंत्रालयांमार्फत राबवण्यात येत



असून कोकणातील सर्व जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्यास प्रतिसाद दिला आहे. प्रायोगिक तत्त्वावर काही आदिवासी महिलांना ड्रोन देण्यात आले असून प्रात्यक्षिकेही दाखवण्यात आल्याची माहिती आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यात आंबा पिकाखालील क्षेत्र वाढत आहे. डोंगर-उतारावर आंब्याची लागवड केली जात असून बागेच्या प्रत्येक कोपऱ्यात यंत्राद्वारे फवारणी करणे शक्य होत नाही. यासाठी जादा मजूर लागतात. शिवाय, वेळही भरपूर जातो. आंबा पिकावर काही ठरावीक दिवसाने औषध फवारणी करावी लागत असताना ती काहींना परवडतही नाही; मात्र ड्रोनद्वारे बागेच्या प्रत्येक कोपऱ्यातील झाडावर योग्य पद्धतीने फवारणी होईल. यातील फवारणीसाठी येणाऱ्या खर्चापेक्षा जास्त उत्पन्न बागायतदारांना मिळेल.

औषधफवारणी करताना तोंडाला मास्क, तर हातात ग्लोव्हज घालणे आवश्यक असते. जर वाऱ्याबरोबर फवारणीचे औषध अंगावर आले तर मजुरांना त्रास होतो. फवारणी करताना अनेकांना जीव गमवावा लागलेला आहे. तसेच, आरोग्याच्या व्याधीही बळावल्या आहेत. ड्रोनद्वारे फवारणी करताना हे धोके दूर टाळता येत असून अवघ्या काही तासांत काम पूर्ण होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

> **कोकणातील आंबा, काजूच्या बागा या डोंगरउतारावर आहेत. विशेषतः आंबा पिकावर फवारणी करताना बागायतदारांना अनेक अडचणी येतात, त्यामुळे वेळेत फवारणी करणे शक्य होत नाही. मनुष्यबळाअभावी फवारणीत विलंब झाल्यास फळाचा दर्जा खालावतो. रायगड जिल्ह्यात ड्रोन तंत्राचा वापर करून फवारणीसाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.**
>
> **- किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड**

## मोहोपाडा येथे हरिनाम सप्ताह

**रसायनी :** गुरुवर्य बाळाराम महाराज कांबेकर यांच्या कृपाशीर्वादाने वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी, पाताळगंगा, खालापूर, पनवेल परिसर आयोजित तुकाराम गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे मोहोपाडा येथील जनता विद्यालयाच्या मैदानावर नामांकीत महाराजांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह शुक्रवार, दि.६ ते १३ डिसेंबर या कालावधीत संपन्न होणार आहे. यानिमित्ताने दि.६ ते १२ डिसेंबर रोजी रोजी दुपारी ४ ते ५ प्रवचनाचा कार्यक्रम, ५ ते ६ वाजता सामुदायिक हरिपाठ, रोज रात्री ७ ते ९ वाजता कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत तर रात्री १०.३० ते १२ वाजेपर्यंत रसायनी पाताळगंगा परिसरातील सांप्रदायाचे जागर भजन होईल. गुरुवार, दि.१२ रोजी दुपारी ३ ते ६.३० वाजता दिंडी सोहळा संपन्न होणार असून ६.३० ते ७.३० वाजता दीपोत्सव होणार आहे.

# दीड लाखांची फसवणूक

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

एक लाख रुपयांच्या बदल्यात पाच लाख रुपये देतो अशी खोटी जाहिरात करून दीड लाख रुपये घेऊन त्या बदल्यात बनावट नोटा देऊन फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पवन सरोजकर हा उल्हासनगर, कल्याण येथे राहत असून, वाहन चालक म्हणून नोकरी करतो. २४ फेब्रुवारी रोजी त्याला मोबाईलवर जाहिरात दिसली. यावेळी एक लाख रुपयाला पाच लाख रुपये मिळणार असल्याबाबतची जाहिरात होती. त्याने व्हिडिओमध्ये असणाऱ्या मोबाईलवर फोन केला असता समोरील इसमाने त्याचे नाव विशाल असे सांगितले. यावेळी पवन दीड लाख गुंतवणूक तयार झाला. त्याने फोनवरून कुठे यायचे याबाबत विशालला विचारणा केली. यावेळी दुसरा मोबाईल क्रमांक देऊन फोन करण्यास सांगितले. त्या फोनवर फोन केला असता समोरील इसमाने त्याचे नाव माणिक शाह असे सांगून पनवेल बस स्टॉप येथे येण्यास सांगितले. त्यानंतर २५ नोव्हेंबर रोजी पवन व त्याची पत्नी काजल हे म ोटरसायकल घेऊन उल्हासनगर येथून पनवेल बस स्टॉप येथे आले. त्यानंतर माणिक शहा यांनी त्यांना ओरियन मॉल पनवेल येथे येण्यास सांगितले. पत्नीला बस स्टॉप ला थांबवून पवन ओरियन मॉल येथे गेले. यावेळी एका इसमाने माणिक शहा यांनी पाठवले असल्याचे सांगून ओरियन मॉलच्या मागील बाजूस घेऊन गेला. त्यावेळी त्याचा एक मित्र पांढऱ्या रंगाची एक्टिवा गाडी घेऊन आला. त्यात एक बॅग होती ती बॅग उघडून दाखवली. त्यातील बंडल काढून पाचशेची नोट पवनच्या हातात दिली. ती नोट खरी असल्याने पवन याने दीड लाख रुपये त्याच्याकडे दिले. त्यानंतर त्या इसमाने बॅगेतील पैशांचे बंडल काढून पवनच्या पिशवीत टाकले. काही वेळाने ते दोघेही ॲक्टिवा मोटारसायकलवर बसून निघून गेले.

पवनने पैसे तपासून पाहिले असता प्रत्येक बंडलला वर खाली एक नोट खरी बाकी नोटा नकली असल्याचे दिसून आले. माणिक शहाला फोन करून विचारणा केली असता त्याने ठाणे येथे येण्यास सांगून पैसे परत देतो असे सांगितले.

# स्वाती टिल्लूंची चौल गावास सदिच्छा भेट

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

परिसरातील ऐरोली येथे राहणाऱ्या स्वाती टिल्लू या पर्यावरण संवर्धनाचे काम करीत आहेत. स्वच्छता करण्यासाठी सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या रासायनिक द्रव्यांना नैसर्गिक पर्याय म्हणजे बायो एन्झाईम. लिंबूवर्गीय फळांच्या सालांपासून अशा प्रकारचे बायो एन्झाईम घरच्या घरी बनविता येते. बायो एन्झाईमचा वापर वाढल्यास रसायनांमुळे होणारे प्रदूषण थांबविता येईल. पर्यावरण संवर्धनाचे काम करणाऱ्या संस्था, तसेच विविध सामाजिक संस्था आणि महिला वर्गाने पुढाकार घेतल्यास त्यासंबंधीचे प्रशिक्षण देण्याचे काम स्वाती टिल्लू करतात.

अलिबाग तालुक्यातील निसर्ग आणि जैवविविधतेने नटलेल्या चौल आणि रेवदंडा या जोडगावांना सौ. टिल्लू यांनी भेट दिली. या भेटीत त्यांनी रेवदंडा येथील समुद्रकिनारा तसेच चौल गावातील प्राचीन मंदिरांचे दर्शन घेतले. तसेच या भेटीत त्यांनी चौल येथील निसर्गप्रेमी संस्थेच्या कार्यकर्त्यांना भेटून चौल ग्रामस्थांना बायो एन्झाईमविषयी प्रशिक्षण देण्यासंदर्भात इच्छा व्यक्त केली. चौल येथील विविध प्रकारच्या वनस्पतींचा संग्रह असलेल्या राईलकर वाडीस त्यांनी भेट दिली. या गावांमध्ये घरोघरी बायो एन्झाईमचा वापर वाढल्यास येथे असलेल्या निसर्गाचे संवर्धन होण्यास मदत होईल. यामुळे भविष्यात चांगले परिणाम घडून पर्यटन वाढीस चालना मिळेल, असे त्या म्हणाल्या.

## एकविरा पालखीचे कार्ला येथे प्रस्थान

**चौक :** चौक येथील आई एकविरा ग्रुप चौक परिसर यांच्यावतीने सालाबादप्रमाणे यंदा पाचव्या वर्षी गुरुवार, दि. २८ ते शुक्रवार, दि. २९ नोव्हेंबर या कालावधीमध्ये चौक तीनघर महालक्ष्मी मंदिर चौक ते श्रीक्षेत्र एकविरा मंदिर कार्ला येथे पायी पालखीचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात चौक परिसरातील महिला, पुरुष, एकविरा भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालखीसमयी बँड, डीजे यांच्या आकर्षणामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला होता.


यावेळी शे.का.पक्षाचे नेते प्रीतम म्हात्रे यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यांनीसुद्धा पालखीला खांदा दिला. त्यांच्या चारही बाजूने कार्यकर्त्यांनी गराडा घातला होता. यावेळी चौकमधील अनेक पक्षांचे कार्यकर्ते आई एकविरा माऊलीच्या पालखीत सामील झालेले दिसून आले.

# सराईनजीक प्राचीन कलावंतीनीचा वाडा भग्नावस्थेत

**। रायगड । प्रतिनिधी ।**

चौलला ऐतिहासिक वारसा आहे, येथे अनेक प्राचीन मंदिरे तसेच वास्तू आजही पहावयास मिळतात. चौल परिसरातील सराईनजीक कलावंतीनीचा वाडा हा त्यापैकीच एक आहे. मुसलमानी पध्दतीचा आदिलशाही व निजामशाही राजवटीच्या काळात करमणुकीसाठी कलावंतीनीचा वाडा बांधला असावा, असे सांगितले जाते. त्याकाळी कलावंतीनीचा वाडा चौलची ओळख होती, असे इतिहासात वाचावयास मिळते. पुरातत्व खात्याकडे असलेल्या कलावंतीनीचा वाडा पूर्णतः भग्नावस्थेत असल्याचे दिसून येते.

चौल ते वावे मुख्यः रस्त्यालगत चौल ग्रा.पं. हद्दीतील सराईनजीक प्राचीन कलावंतीनीचा वाडा आहे.



या वाड्याच्या समोरील व मागील बाजू ठीकठाक अवस्थेत आहे, मात्र आजूबाजूची तटबंदी पूर्णतः भग्न झालेली दिसते. त्याच्या दर्शनी बाजूस घडीव दगडाच्या तीन शिखर असलेल्या कमानी व तीन विटांनी बांधलेले घुमट होते. सभागृहात तीन घुमट व दोन्ही बाजूस दोन मोठ्या देवळ्या होत्या. त्याच्या पश्चिमेला ५० पावले रूंद व ७० पावले लांब अशी चहू बाजूंनी भिंती बांधलेली जागा होती. या कलावंतीनीच्या वाड्याच्या पाठीमागे मोठे तळे आहे, प्राचीन काळी येथील कलाकारासाठी पाण्याची सोय असू शकेल. ऐतिहासिक नजरेतून त्या वास्तूत शांतपणे उभे राहिल्यास प्राचीनकाली थिरकणाऱ्या घुंगराचा आवाज आणि नाद कानावर पडल्याशिवाय राहात नाही.

# भातशेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा : म्हात्रे

**। खरोशी । वार्ताहर ।**

पूर्वी तरुण मुले आवडीने शेतात काम करायचे पण जसजशी आर्थिक परिस्थिती सुधारत गेली, तसे हे तरुण मेहनत करायला कमी पडू लागले. हे काम कमीपणाचे वाटू लागले. पर्यायाने काम करणारे माणसे कमी होत गेली. आता तर परके (आज माझ्या कामासाठी, तर उद्या तुझ्या कामासाठी) म्हणजेच उसनवार माणसे ही पद्धत बंद झाली. हांदा पद्धत लोप पावली. आत्ता तर बरीच शेती ओस पडत चालली आहे. फुकटात शेती करा, असे आवाहन मोठे शेतकरी करू लागलेत. त्यामुळे भातशेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते सी.आर. म्हात्रे यांनी केले.

एक लीटर डिझेलमध्ये कापणी यंत्र पाच माणसांचे काम करतो एक माणूस दिवसभरात एक एकर शेती या यंत्राच्या साहाय्याने कापणी करतो. आत्ता तर ब्लॅक राइस ही नवीन प्रजाती निर्माण केली गेली आहे. कॅन्सरवर उपयोगी भात अशी ओळख आहे. ३०० रुपये किलो भावात विकला जातो. प्रायोगिक तत्त्वावर लागवड करून पारंपरिक शेतीवर मात करता येईल. माशे तलाव जसा पर्याय शोधला, तसाच पर्याय शोधावा लागेल, तरच शेतीबरोबर शेतकरी वाचेल. लवकरच ७६६ कोटी रुपयांचा सिंचन प्रकल्प सुरू होईल. शेतकरी नक्कीच सुधारेल. बागायती शेती पण तयार होईल. पण कधी सिंचनाचे पाणी आल्यावरच... तोपर्यंत शेती वाचवा, प्रगती करा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून

## डिझेल तस्करीचे जोमात, प्रशासन कोमात

१९९२ मध्ये मुंबईत साखळी बॉम्बस्फोट झाला. त्यापूर्वी श्रीवर्धनमधील शेखाडी खाडीकिनारी आरडीएक्सचा साठा सापडला होता. मुंबईमध्ये २६ नोव्हेंबर २००८ मध्ये दहशतवादी हल्ला झाला. सागरी मार्गानेच येऊन हा हल्ला करण्यात आला होता. समुद्र मार्गानेच हल्ले होऊन अनेकांचा जीव गेला आहे. या घटनांना रोखण्यासाठी सरकारने त्यावेळी सागरी सुरक्षेवर भर दिला. मुंबईत जाण्यासाठी मांडवा बंदरातून जलवाहतुकीने प्रवास केला जातो. त्यामुळे सागरी सुरक्षेसाठी मांडवा सागरी किनारी व अन्य सागरी किनारी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यापासून पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला. परंतु, नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे जिल्ह्याचा कारभार सुरु असल्याचे दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्यातील मांडवा, रेवदंडा, श्रीवर्धनसह अन्य बंदरांपासून काही अंतरावर रात्रीच्यावेळी डिझेल तस्करी होत आहे. बाहेरून येणाऱ्या बोटींतील व्यक्तींशी साटेलोटे करून त्यांच्याकडून डिझेल घेतले जाते. त्यानंतर बंदरावर आणून टँकरमार्फत त्याची वाहतूक केली जाते, अशी माहिती आहे. अनेक वेळा काही पेट्रोल पंपावरही हा डिझेलचा साठा विकला जात असल्याची माहिती समोर येत आहे. ही बाब रायगडच्या पोलिसांना माहिती असतानाही त्यांच्याकडून बघ्याची भूमिका घेतली जात असल्याची खंत तक्रारदारांकडून उमटत आहे.

कडीया व राजू पंडीत यांच्यामार्फत ही डिझेल तस्करी रायगड जिल्ह्यात होत असल्याचे बोलले जात आहे. याबाबत अनेक वेळा तक्रारीही केल्या आहेत. परंतु, त्यांच्याविरोधात ठोस कारवाई पोलिसांकडून झाली नसल्याचा आरोपही केला जात आहे. सागरी किनाऱ्यांवर होणाऱ्या या डिझेल तस्करीमुळे सागरी सुरक्षा धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सागर प्राईड, सागर फँचून, सागर एनर्जी या बोटीतून डिझेलची तस्करी केली जात आहे. बेकायदेशीर डिझेल तस्करीचा धंदा खुलेआमपणे राजकीय नेते मंडळींना हाताशी धरून चालू ठेवला जात आहे. जिल्ह्यात या तस्करीला ऊत आला असताना आता याचे कनेक्शन रत्नागिरीशी जुळल्याचे चित्र आहे. अंजनवेल येथील समुद्रकिनारी १८ नोव्हेंबर रोजी निवडणुकीच्या कालावधीत पहाटेच्या दरम्यान स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन ढेरे गस्तीवर होते. त्यावेळी काही इसमांची संशयित हालचाल त्यांना दिसून आली. जेट्टीलगतच्या समुद्राच्या पाण्यामध्ये एक मच्छिमार बोट, एक रिकामे टँकर व चारचाकी वाहन त्यांना दिसले. पथकामार्फत तेथील इसमांची खात्री व मच्छिमार बोटीची तपासणी करण्यात आली. त्यावेळी डिझेलचा साठा त्यांना आढळून आला. रात्रीचा फायदा घेत सक्शन पंप व रबर पाईपच्या मदतीने रिकाम्या टँकरमध्ये डिझेल भरत होते. दरम्यान, दोन कोटी, पाच लाख, ९५ हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. त्यामध्ये २५ हजार लीटर डिझेलचा समावेश आहे. नऊ जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यामध्ये उरणमधील निरंजन कोळी, जितेमधील विश्वनाथ ठाकूर, मिलिंद ठाकूर यांचा सहभाग असल्याचे उघड झाले. ही मंडळी राजू पंडितसाठी काम करीत असल्याची माहिती समोर येत आहे.

रायगडसह आता डिझेलचे कनेक्शन रत्नागिरीसोबत असल्याचे उघड झाल्याने किनाऱ्यांवरील सुरक्षा धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## जनमतावर डाका टाकला : नाना पटोले

आयोगाकडून सांगितले जाते की, ६६.५ टक्के मतदान झाले. मतदान झाल्यानंतर मतदानाची माहिती निवडणूक आयोगाकडून पत्रकार परिषदेत दिली जाते, ही पद्धत आहे. परंतु, महाराष्ट्रातील निवडणूक आयोगाने कोणत्याही प्रकाराची पत्रकार परिषद घेतलेली नाही. सुमारे ७६ लाखांची मतांची वाढ झालेली आहे. त्यामुळे आयोगाच्या पारदर्शकेतवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. जनतेची मते चोरण्याचे आणि डाका टाकण्याचे काम आयोगाने केल्याचे यातून सिद्ध होत आहे. याचे उत्तर निवडणूक आयोगाने दिले पाहिजे, अशी मागणी पटोले यांनी केली आहे.

## सोरेन सरकार

मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे पुत्र आहेत. २००९ साली राज्यसभा सदस्य म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली होती. मात्र, २०१० मध्ये या पदाचा राजीनामा देऊन ते तत्कालीन मुख्यमंत्री अर्जुन मुंडा यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री बनले. २०१३ साली हेमंत सोरेन त्या राज्याचे सर्वात तरुण मुख्यमंत्री झाले. त्यानंतर २०१९ साली काँग्रेस, राजदच्या पाठिंब्यावर ते पुन्हा झारखंडच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले होते. यावर्षी इडीने अटक केल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. मात्र तुरुंगातून सुटका झाल्यानंतर ते पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनले.

## जेलिफिशमुळे मासेमारी धोक्यात

किनाऱ्यावर रिकाम्या हाताने परतल्याचे निशानदार यांनी सांगितले. यामध्ये रोहन निशानदार यांच्या नौकेचादेखील समावेश आहे. कोलंबी, बोंबील मासळी जेमतेम २० टक्केच मिळाली आहे. जेलिफिशमुळे मासेमारी धोक्यात आल्याने कोळी बांधव हवालदिल झाले आहेत.

मुरूड समुद्रात सध्या कोलंबी मासळीचा हंगाम सुरू आहे. चैती, टायनी या जातीची कोलंबी मच्छिमारांना मिळत असल्याने येथील नौका कोलंबी मासेमारीस जात होत्या. मात्र, बुधवारी (दि. २७) मासेमारीसाठी गेलेल्या नौकांच्या जाळ्यात कोलंबीऐवजी जेलिफिश मोठ्या प्रमाणात आल्याने मच्छिमारांना धक्काच बसला. एकूण परिस्थितीचा अंदाज घेत मच्छिमार मेहनत आणि नुकसान सहन करीत किनाऱ्यावर परतले. मागील वर्षीदेखील अशीच मोठ्या प्रमाणात समुद्रात जेलिफिश उठल्याने मासेमारी ठप्प झाली होती.

मुरूड समुद्रात जेलिफिश आल्याने गुरुवारी एकदरा-मुरूड भागातील नौका समुद्रात मासेमारीसाठी गेल्या नाहीत. असा प्रकार किती दिवस राहील याचा अंदाज येत नाही. मात्र, यामुळे कोलंबीच्या हंगामात मच्छिमारांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

- रोहन निशानदार, मच्छिमार

## खाऊगल्लीमुळे आजाराला निमंत्रण

तर खाऊगल्लीतील अस्वच्छता पाहता तिथे पदार्थ खाणे म्हणजे आजाराला निमंत्रण करणे होय.

पेणच्या खाऊगल्लीत उभ्या असलेल्या २५ ते ३० गाडीवाल्यांकडे अन्न भेसळ खात्याचा कोणताही परवाना नाही. असे असतानादेखील अन्न भेसळ खात्याचे कर्मचारी व अधिकारी या गाड्यांविरुद्ध कारवाई करण्यास पुढे येत नाही. याचाच अर्थ, असे समजू नये का? अन्न भेसळ खात्याच्या अधिकाऱ्यांचा व खाऊगल्लीतील गाडीवाल्यांचे काही टेबलाखालील संबंध नाहीत ना? आताच्या स्थितीला तेथे वापरण्यात येणारा तेल, चिज, बटर यांची क्वॉलेटी पाहिली तर ते शरीरासाठी अपायकारक आहेत. चायनीज पदार्थांमध्ये वापरण्यात येणारा अजिनोमोटो, रंग, वेगवेगळे सॉस हेदेखील कमी दर्जाचे असल्याने शरीराला अपायकारक असतात. तसेच येथे बंद बुच पाण्याच्या बॉटलदेखील विक्रीसाठी असतात. बऱ्याचशा बॉटल या आयएसआय मार्कच्या नसल्याने भेसळयुक्त पाणी देखील विक्रीसाठी ठेवले जाते. या सर्व बाबींकडे लक्ष देण्यासाठीच अन्न भेसळ खात्याची जबाबदारी असते; परंतु अधिकारी वर्ग आपली जबाबदारी पार पाडताना दिसत नाहीत. खाऊ गल्लीतील टपऱ्यांना संरक्षण देण्यासाठी काही नगरपालिकेचे कर्मचरी या टपरीधारकांकडून महिन्याला आर्थिक हितसंबंध जपत असल्याने परप्रांतीय टपरीवाले शिरजोर झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांशी हे टपरीचालक फटकून बोलत आहेत. त्याचप्रमाणे कुणी विद्यार्थ्यांनी उलटून उत्तर दिल्यास नगरपालिकेचे कर्मचारी या विद्यार्थ्यांना दमही देताना दिसत आहेत. याबाबीकडे नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी गांभीर्याने लक्ष घालावे अन्यथा भविष्यात जनसामान्यांची आरोग्यविषयक काही वाईट घडल्यास ही जबाबदारी नगरपालिका स्वीकारेल का? याविषयी विचारणा करण्यासाठी आमच्या प्रतिनिधींनी मुख्याधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होउ शकला नाही.

**दूषित पाण्याने अनेक आजारांना निमंत्रण**

मुले संध्याकाळी घराबाहेर पडतात ती बाहेरून काही ना काही खाऊनच घरी परतात. मात्र, तेथे दूषित पाण्याचा वापर होत असल्यास विविध आजाराला निमंत्रण मिळू शकते. पाणीपुरीसारख्या खाद्य पदार्थ देणाऱ्यांचे हात पाहिल्यास बऱ्याच वेळेला त्या हातांच्या सहाय्यानेदेखील आजार पसरण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच पाणीपुरीमध्ये दूषित पाण्याचा वापर झाल्यास जुलाब, उलटी, ताप किंवा टायफॉइडही होऊ शकतो. त्यामुळे बालकांची काळजी घेणे व त्यांना बाहेरील खाद्यपदार्थ देणे टाळावे.

**स्थानिकांपेक्षा परप्रांतियांच्याच गाड्या जास्त**

या खाऊगल्लीत असणाऱ्या गाड्यांमध्ये स्थानिक तरुणांपेक्षा परप्रांतियांच्याच गाड्या जास्त असल्याचे आढळत आहे. त्यामुळे या परप्रांतियांना स्थानिकांच्या आरोग्याशी काही घेणे देणे नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अन्न पदार्थांसाठी वापरण्यात येणारे सामान हा दुय्यम क्वॉलेटीचे असते. त्यामुळेच मोठ्या प्रमाणात अन्नपदार्थ हे योग्य क्वॉलिटीचे नसतात.

नगरपालिकेपासून हाकेच्या अंतरावर खाऊगल्ली आहे. मात्र, येथील अस्वच्छता पाहता बऱ्याच वेळेला दुर्गंधी सुटून नाकाला रुमाल लावण्याची वेळ येते. ही बाब लक्षात घेउन नगरपालिकेच्या आरोग्य विभागाने सर्व गाडी चालकांना स्वतःचे डस्टबीन वापरण्याची तंबी दिली आहे. ओला व सुका कचरा वेगळा करण्यास सांगितले आहे. परंतु ९० टक्के गाडीवाले नगरपालिकेचे आदेश धुडकावून देत आहेत. याबाबत नगरपालिकेने योग्य ती स्वच्छता न पाळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल. **- दयानंद गावंड, निरीक्षक, आरोग्य विभाग**

# पनवेलकरांना श्वसनाच्या आजारांचा विळखा

## ■ प्रदूषणामुळे सर्दी, खोकल्याच्या रुग्णांत वाढ

**। पनवेल । वार्ताहर ।**

थंडीची चाहूल लागताच पनवेलमध्ये ताप, सर्दी, खोकल्याचे रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. वाढत्या प्रदूषणामुळे, धुलिकणांच्या त्रासामुळे श्वसनविषयक आजारांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. पालिकेच्या दवाखान्यातून मोफत उपचार केले जात असले तरी खासगी दवाखान्यातील ओघही कमी झालेला नाही. दरम्यान, पालिकेने सर्व दवाखाने आता पूर्णवेळ म्हणजेच सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवले असल्याचे रुग्णांना दिलासा मिळत आहे.

पनवेल महापालिका क्षेत्राजवळ तळोजा परिसरात प्रदूषित कारखाने आणि मोठ्या प्रमाणात दगड खदाणी आहेत. आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम या परिसरात सुरू असल्याने मोठ्या प्रमाणात धुलिकण पनवेलच्या हवेमध्ये असल्याने पनवेलच्या दूषित हवेमुळे श्वसनाशी संबंधित आजाराच्या रुग्णांची वाढत आहे. पनवेलमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तोंडरे आणि कळंबोली या परिसरात हवेतील गुणवत्ता तपासण्यासाठी यंत्र उभारले आहे. तळोजा परिसरातील तोंडरे गावातील या यंत्रातून हवेतील गुणवत्ता पी.एम. २.५ चा स्तर ११४ पर्यंत नोंदविला जात आहे. मागील वर्षभरात पालिकेच्या विविध दवाखान्यांमध्ये सात दिवसांपेक्षा कमी वेळेपर्यंत ताप राहीलेल्या १८,४९१ रुग्णांची नोंद झाली. तर सात दिवसांपेक्षा अधिक दिवस ताप असलेल्या रुग्णांची संख्या ३,३२८ एवढी नोंदविली गेली. तसेच मागील वर्षभरात सात दिवसांपेक्षा कमी काळ खोकला असलेल्या रुग्णांची संख्या ११,२६४ होती तर सात दिवसांपेक्षा अधिक काळ खोकला असल्या रुग्णांची संख्या ४,२८६ नोंदविली गेली.

मागील वर्षीपेक्षा यावेळी पालिका क्षेत्रात पालिकेच्या दवाखान्यांची संख्या २६ वर पोहोचली आहे. त्यामुळे सर्दी, खोकला, ताप यांसारख्या आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या दुपटीने वाढली आहे. हे वर्ष संपण्यासाठी अजून महिना शिल्लक असेपर्यंत पालिकेच्या २६ विविध दवाखान्यांमध्ये आजारावरील उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या ५,३८,९९० वर पोहचली आहे. मागील वर्षी ३,०८, ३६८ रुग्णांनी पालिकेच्या दवाखान्यात उपचार घेतले होते. वाढलेल्या रुग्णसंख्येमुळे यंदा ताप, सर्दी, खोकल्याचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आतापर्यंत नोंदविले गेले आहेत. यावेळी सात दिवसांपेक्षा कमी दिवस ताप असलेले रुग्ण मागील वर्षीपेक्षा दुपटीने जास्त आढळले आहेत. यंदा ३८,१५८ रुग्णांची नोंद झाली आहे. तसेच सात दिवसांपेक्षा अधिक काळ ताप असलेल्या रुग्णांची संख्या ५,०८० नोंदविली गेली आहे. तसेच यंदा सात दिवसांपेक्षा कमी दिवस खोकला असलेले रुग्ण १७,३५१ तर सात दिवसांपेक्षा अधिक काळ खोकला असलेले रुग्ण ३,६५३ एवढे आढळले आहेत.

दरम्यान, पनवेल पालिकेच्या आरोग्य विभागाने यापूर्वी साथरोगापासून बचाव करण्यासाठी वेळोवेळी घरोघरी जनजागृतीची पत्रके वाटली आहेत. संसर्ग आजार असलेल्या रुग्णांनी प्रवास टाळणे, गर्दी टाळणे, सतत हात धुणे, ताजे घरातील अन्न खावे ही त्रिसूत्री पाळण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे.

## ताडी दुकानांचा ई-लिलाव

**रायगड :** सन २०२४-२५ साठी रायगड जिल्ह्यातील ८१ ताडी दुकानांचा जाहीर लिलाव (ई-लिलाव-नि-निविदा) पध्दतीने दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर घेण्यात येणार आहे. संबंधितांना कळविण्यात येते की, सदर ई-लिलावाच्या अटी व शर्ती तसेच प्रक्रियेबाबत अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग व सर्व विभागीय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

**जाहीर सुचना**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. धनाजी शंकर ठाकुर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे कडाव, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १०८/८/अ एकुण ०.५५.०० गुंठे जागा व सर्व्हे नं १०८/८/ब/२ एकुण ०.२२.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २९/११/२०२४

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
**पत्ता. मु.पो कडाव ता. कर्जत रायगड**
**भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८**

निवडक

## मैफल गप्पांचे आयोजन

**पनवेल :** नवीन पनवेलच्या आचार्य अत्रे कट्ट्यावर लेखिका, दिग्दर्शिका,नाट्य-चित्रपट अभिनेत्री मधुरा वेलणकर यांच्या मैफल गप्पांची या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि.१) सायंकाळी ५.३० वाजता ज्येष्ठ नागरिक संघ हॉल, नवीन पनवेल येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. या कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन या अरविंद करपे यांनी केले आहे.

## क्रेडिट कार्डवरून फसवणूक

**पनवेल :** क्रेडिट कार्डवरून एक लाख ६४ हजारांची फसवणूक केल्याची घटना कामोठे येथे घडली. अमोल गुरव यांना एक फोन आला आणि बँकेच्या क्रेडिट कार्ड डिपार्टमेंट मधून बोलत असून क्रेडिट कार्डवर जास्त सर्विस कर आकारण्यात येणार असल्याचे सांगितले. तो कमी करण्यासाठी बँकेचे ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. यावेळी अमोल यांनी ॲप डाऊनलोड केले. त्यानंतर यांच्या क्रेडिट कार्डवरून अनधिकृत व्यवहार होण्यास सुरुवात झाली.

## महिलेची आत्महत्या

**नवीन पनवेल :**महिलेने आत्महत्या केल्याप्रकरणी पती आणि सासरे यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मिथिलेश पयाशी हिचे लग्न अंजनी द्विवेदी यांच्यासोबत २०१८ मध्ये झाले. तिला आई-वडिलांकडून पैसे आणण्यास सांगत होते आणि पैसे घेऊन ये नाहीतर तुला मारून टाकू असे पती व सासरे बोलत असल्याचे तिने तिच्या वडिलांना सांगितले होते. २० एप्रिल २०२४ रोजी मिथिलेश हिने गळफास घेऊन आत्महत्या केली.

## गळ्यातील चेन चोरली

**नवीन पनवेल :**काळ्या रंगाच्या स्कुटीवर आलेल्या दोन इसमांनी महिलेच्या गळ्यातील अडीच तोळ्याच्या चेनची चोरी केल्याची खटना घडली. महिला भाजीपाला घेण्यासाठी पायी गेली होती. भाजीपाला घेऊन परत येत असताना सिडको बिल्डिंगच्या समोरील मुख्य रस्त्यावर सेवन इलेव्हन शॉपच्या समोरआल्या. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोन इसमांनी त्यांच्या गळ्यातील अडीच तोळ्याची चेन जबरदस्तीने खेचून नेली आणि ते भरधाव वेगाने पळून गेले.

## रोहित्रामध्ये चोरी

**नवीन पनवेल :** सेक्टर १७, कळंबोली येथील सबस्टेशनच्या रोहित्रामध्ये असलेल्या तांब्याच्या तारा आणि ऑईलची चोरी केल्याप्रकरणी आरोपी विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सेक्टर १७, कळंबोली येथील सब स्टेशनच्या रोहित्रामधील ७५ हजार रुपये किमतीच्या साडेचारशे किलो वजनाच्या तांब्याच्या तारा आणि ५८ हजार ४०० रुपये किमतीचे ७३० लिटर ऑइलची चोरी केली.



# शिवशाहीचा कारभार आटोपला?



### विनाथांब्यासाठी साध्या एसटी बसचा वापर
### एसटी बस आगारातील अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

अलिबाग एसटी बस स्थानकातून पनवेलपर्यंत विनाथांबा शिवशाही एसटी बस सोडल्या जात होत्या. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून एसटी बस स्थानकातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराचा फटका या मार्गावरील प्रवाशांना बसत आहे. विना थांब्यासाठी साध्या एसटी बसचा वापर केला जात आहे. त्यामुळे प्रवासी वर्गात अधिकाऱ्यांच्या कारभाराबाबत नाराजीचे सूर उमटत आहे.

अलिबागकडून मुंबई,ठाणे, बोरीवलीकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या प्रचंड आहे. पनवेलहून एसटीतून गेल्यावर अन्य वाहनांनी मुंबई, ठाणेकडे जाणाऱ्या प्रवाशांना त्यांच्या निश्चितस्थळी पोहचता येते. अलिबाग-पनवेल विनाथांबा प्रवासासाठी अलिबाग एसटी बस आगारात १८ शिवशाही बसेस दाखल झाल्या. सकाळी सहा वाजल्यापासून रात्री नऊवाजेपर्यंत ही सेवा दिली जाते. त्यामुळे पनवेलचा दोन तासाचा प्रवास दीड ते पावणे दोन तासाचा होऊ लागला. शिवशाही एसटी बस वातानुकूलित असल्याने प्रवाशांचा प्रवास आरामदायी होऊ लागला. साध्या बस ऐवजी शिवशाहीतून थेट पनवेलला जाण्यावर प्रवाशांनी भर दिला आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून एसटी बस स्थानकातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभार समोर आला आहे. शिवशाहीला पसंती असतानादेखील स्थानकातील काही अधिकारी प्रवाशांच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत विनाथांब्यासाठी साध्या एसटी बसचा वापर करीत आहेत. अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराबाबत प्रवासी वर्गात तीव्र संताप आहे. एसटीचे उत्पन्न वाढविणे दूर प्रवासी संख्या कमी होण्याची भिती व्यक्त होत आहे.

**मनमानीकरणाऱ्यांवर कारवाई होणार का?**

अलिबाग-पनवेल विनाथांबा शिवशाही एसटीतून प्रवास करण्याला प्रवासी पसंती दर्शवित आहेत. शिवशाही एसटी असेल, तरच प्रवास करण्यावर भर देत आहे. मात्र स्थानकातील काही अधिकारी त्यांच्या मनमानी कारभारामुळे आगारातील उत्पन्न घटविण्याच्या मार्गावर असल्याची चर्चा होत आहे. त्यामुळे विभाग नियंत्रक दिपक घोडे या अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करतील का असा सवाल उपस्थित केला जात आहे.

> “अलिबाग एसटी बस आगारात १८ हून अधिक शिवशाही एसटी बसेस आहेत. या बसचा विनाथांब्यासाठी वापर केला जातो. आरामदायी प्रवास या एसटीतून होत आहे. परंतु आगारातील अधिकारी त्यांच्या मर्जीने कारभार करीत प्रवाशांची गैरसोय करीत आहेत. अनेक वेळा त्यांना सांगण्यात आले आहे. तरीही ते दुर्लक्ष करीत आहेत. शिवशाही विनाथांब्यासाठी बस सुरु ठेवण्यात यावी अशी प्रवाशांचीदेखील मागणी आहे.”
>
> – समिर रांजणक, रायगड एसटी प्रेमी

> “अलिबाग एसटी बस आगारात १९ बसेस आहेत. दहा बसेस विना थांबा सेवेसाठी उपलब्ध आहेत. प्रवाशांची मागणी वाढत आहे. त्यामुळे प्रवासी संख्या जास्त झाल्यावर साध्या बसेस वापरल्या जातात. परंतु प्रवाशांसाठी शिवशाही बसेस वापरण्याच्या सुचना संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना दिल्या जातील. याकडे भर दिला जाईल.”
>
> – राकेश देवरे, आगार व्यवस्थापक

# उरणमध्ये शेकापचा मतटक्का वाढला



- **पक्षाचे जुने व तरुण कार्यकर्ते झाले सक्रिय**
- **शेकापक्षाला नवसंजीवनी प्राप्त झाल्याने उत्साह**

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीत उरण मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाच्या मतांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने पक्षाला नवसंजीवनी प्राप्त झाली असून, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षाचे जुने व तरुण कार्यकर्ते सक्रिय झाले आहेत. कार्यकर्त्यांच्या सक्रियतेमुळे उरण तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाला उर्जितावस्था मिळाली असल्याने कार्यकर्ते आनंदीत आहेत.

उरण तालुका हा शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला राहिला आहे. तसेच लढाऊ तालुका म्हणूनही पक्षाची एक ओळख आहे. दरम्यान माजी खासदार दि.बा. पाटील, यांच्यासह माजी विरोधी पक्षनेते स्व. दत्ता पाटील, माजी मंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांनी या तालुक्याचे नेतृत्व केले आहे. गेल्या ५० ते ६० वर्षांपासून उरण तालुक्यातील गावोगावी शेकापक्षाची ताकद आहे. मात्र, दरम्यानच्या काळात ही ताकद गेल्या दहा वर्षांत कमी होऊ लागली होती. अनेकांनी तर भाजपा व शिवसेनेची वाट धरली आहे. त्यामुळे शेतकरी कामगार पक्ष खिळखिळा झाला होता. मात्र, शेकापक्षाला नवसंजीवनी आणण्यासाठी उरण विधानसभा निवडणुकीतून शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेतृत्व प्रीतम म्हात्रे यांनी विधानसभेची उमेदवारी लढविली. आणि या निवडणुकीत शेकापची ताकद दाखवून, त्यांनी या निवडणुकीत तब्बल ९० हजार मतांचा आकडा गाठला आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना नवसंजीवनी मिळवून दिली आहे.

२०२४ च्या निवडणुकीत उरण मतदारसंघात शेकापक्षाला मिळालेली आत्तापर्यंतची सर्वाधिक मते आहेत. २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणुका माजी आमदार विवेक पाटील यांनी लढविल्या. त्यात त्यांचा दोन्ही वेळा पराभव झाला. मात्र, २०२४ ची निवडणूक पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी लढविली. त्यांच्या उमेदवारीमुळे मरगळ आलेला व दुसऱ्या पक्षाच्या वळचणीला गेलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी पुन्हा आपल्या मूळ पक्षात येणे पसंत केले.

# नेरुळ-उरण रेल्वेच्या फेऱ्या वाढवाव्यात

## शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांची मागणी

**। उरण । प्रतिनिधी ।**

नेरुळ ते उरणदरम्यान उलवे, खारकोपर, द्रोणागिरी, उरण शहर या नव्याने वाढत असलेल्या शहरांमधील लोकवस्ती पाहता सकाळी आणि सायंकाळी कामानिमित्त प्रवासादरम्यान नव्याने सुरू झालेल्या नेरुळ ते उरण ट्रेनच्या फेऱ्या कमी पडत आहेत.



प्रवास करणारा वर्ग हा नोकरदारपासून ते शाळेत जाणारे विद्यार्थी आणि महिला आहेत. त्यासाठी सद्यःस्थितीत असणारी ट्रेन सुविधा कामाच्या वेळी कमी पडत आहे. अशा तक्रारी शेतकरी कामगार पक्षाचे नेते प्रीतम जनार्दन म्हात्रे यांच्याकडे विविध विभागातील नागरिकांकडून आल्या. त्यानुसार त्यांनी नऊ डब्यांच्या जागी १२ डब्यांच्या ट्रेन चालू कराव्या आणि नेरूळ ते उरणदरम्यान ट्रेनच्या फेऱ्या वाढवाव्यात, अशी मागणी केली आहे.

नेरूळ ते उरण रेल्वे फेऱ्यांमधील वेळेचे अंतर हे खूप जास्त आहे. कामाच्या वेळी त्याचा ताण येऊन नागरिकांना मुख्यत्वे करून महिलावर्ग आणि विद्यार्थ्यांना त्याचा त्रास होत आहे, अशा तक्रारी माझ्याकडे आल्या त्यामुळे संबंधित विभागाकडे मी पाठपुरावा सुरू केला असल्याचे प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांना मिळणार शुद्ध पाणी

## हुडको लिमिटेडकडून शेलू शाळेला मदत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शेलू येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत आता सर्व विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळणार आहे. जिल्हा परिषद शाळेसाठी हुडको कंपनीचे सामाजिक बांधिलकी निधीमधून एक लाख दहा हजारांचा निधी देण्यात आल्या आहे.



शेलू या गावातील विद्यार्थ्यांसाठी रायगड जिल्हा परिषदेची पहिली ते आठवीपर्यंत शाळा चालविली जाते. ३०० हून अधिक विद्यार्थी त्या ठिकाणी शिक्षण घेत असून, दुमजली इमारतीमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत असतात. त्या शाळेत येणारे विद्यार्थी हे आपल्यासोबत घरातून पाण्याची बॉटल आणत असतात. मात्र, काही विद्यार्थी हे अशुद्ध पाण्यामुळे आजारी पडत असल्याचे आढळून आले आहे.

ही बाब लक्षात घेऊन शाळेचे मुख्याध्यापक अनंत खैरे आणि माजी शिक्षक राजेंद्र धोत्रे तसेच सुनील जाधव यांनी शेलू शाळेसाठी हुडको कंपनीकडे शुद्ध पाण्याची सोय व्हावी म्हणून शब्द टाकला होता. त्यानंतर हुडको कंपनीकडून सामाजिक बांधिलकी निधीमधून शुद्ध पाण्याची व्यवस्था करता येईल काय? याबाबत पाहणी करण्यात आली.

त्यानंतर हुडको कंपनीकडून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून एक लाख दहा हजार रुपये खर्च करून पाणी शुद्ध करणारी यंत्रणा शाळेच्या आवारात बसवून घेण्यात आली. त्यासाठी हुडको कंपनी कडून कंपनीचे सहव्यवस्थापक प्रवीण, सहायक व्यवस्थापिका प्रगती जाधव, व्यवस्थापक विद्याधर मोकाशी यांनी गावात येऊन पाणी शुद्ध करण्याची यंत्रणा बसवून घेतली.

# शेतातील माच होताहेत कालबाह्य



**शेती कमी होत असल्याचा परिणाम**

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

रायगड हे भाताचे कोठारे म्हणून प्रचलित असून, सध्या याच शेतीला औद्योगिकरणाचे ग्रहण लागले असल्यामुळे भातशेती कमी होत चालली आहे. शेती अल्प असल्यामुळे पारंपरिक पद्धतीने शेती न करता यंत्राच्या सहाय्याने शेती केली जाते. परिणामी, शेतकऱ्यांजवळ असलेल्या गुरे कमी प्रमाणात झाल्यामुळे लाकडी माच बनवून त्यावर पेंढा साठविण्याची कला लुप्त होत चालली आहे.

पूर्वी शेती ही मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेतकऱ्याजवळ गुरे ही खूप असायची. मात्र, गेल्या काही वर्षात औद्योगिकरण तसेच शेतीचे विभाजन झाल्यामुळे शेती ही तुकड्यामध्ये विभागली गेली. त्यातच मुंबईसारख्या धनिकांनी आपली जमीन घेऊन त्या ठिकाणी बंगले बांधले आहेत. परिणामी, लागवडीचे क्षेत्र कमी होत चालले आहे.

शेती करणे म्हणजे पुरेसे मनुष्यबळ असणे गरजेचे असते. मात्र, आता विभक्त कुटुंब उदयास आल्यामुळे एकट्या व्यक्तीला शेती करणे अशक्य होत आहे. त्याचबरोबर शेती नाही तर गुरे नाही. यामुळे पेंढा जमा साठविण्याचे प्रकार बंद झाले. मात्र, आजही ग्रामीण भागात लाकडी माच रचून पेंढा साठविण्याची पद्धत ग्रामीण भागात तुरळक ठिकाणी अनुभवास मिळत आहे.

# महाविद्यालयात संविधान दिन साजरा



**। अलिबाग । वार्ताहर ।**

लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील रा.से.यो. विभाग, डी.एल.एल.ई, राज्यशास्त्र विभाग यांच्यामार्फत महाविद्यालयात संविधान दिन हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रा. प्रितीजा राऊळ यांनी उद्देश पत्रिकेचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. हर्षदा पुनकर यांनी केले.

कार्यक्रमासाठी व्याख्याते म्हणून प्रा. अविनाश ओक, अलिबाग यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रा.ओक यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधान, राज्यघटना, तिचा वापर, महत्त्व, अंमलबजावणी या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन गोंधळी, प्रा. प्रवेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य लीना पाटील, आय.क्यू.एस.सी कोऑर्डिनेटर प्रा. श्रद्धा पाटील, डी.एल.एल.ई विभाग प्रमुख प्रा. प्रितीजा राऊळ, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. हर्षदा पुनकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. तृप्ती खोत तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती लाभली.

# सरकत्या जिन्याचे काम अंतिम टप्प्यात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत स्थानकात फलाट एकवर मुंबई दिशेकडे सरकता जिना बसविला जात आहे. फलाट दोन आणि तीन येथे पूर्वीपासून सरकता जिना असून, फलाट एकवर सरकता नव्याने सरकता जिना बसविला जात आहे. मुंबई दिशेकडे बसविण्यात येत असलेला सरकता जिना हा एकाच वेळी दोन्ही बाजूंनी वापरता येईल, असा असल्याने प्रवाशांनी मध्य रेल्वे प्रशासन आणि रेल कॉर्पोरेशन यांनी आभार मानले आहेत.



मध्य रेल्वेवरील मेन लाईन वरील कर्जत हे महत्वाचे स्थानक आहे. मुंबई आणि पुणे या मार्गावरील महत्वाचे स्थानक असल्याने येथे विकास कामे सुरु आहेत. मात्र मुंबईचे उपनगर म्हणून विकसित होत असताना कर्जत स्थानकात मागील पाच वर्षात काही सकारात्मक बदल होताना दिसत आहेत.फलाट एक वर नव्याने सरकता जिना उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.फलाट एक वर साधारणपणे पुण्याकडे जाणाऱ्या मेल एक्स्प्रेस गाड्या यांची वर्दळ असते. मात्र फलाट एक वर सरकता जिना उभारण्यात यावा अशी कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनची अनेक वर्षांपासून मागणी होती.त्यात मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडून देखील स्थानकातील विकासकामांचा पाठपुरावा रेल्वे प्रशासनाकडे सुरु होता.

फलाट एक वर मुंबई दिशेकडे सरकता जिना बनविण्यात येत आहे. त्या ठिकाणी आता एकावेळी उतरण्यासाठी आणि चढण्यासाठी अशा दोन्ही स्वरूपात सरकते जिने असणार आहेत.त्यामुळे प्रवाशांची मोठी सोय होणार असून कर्जत स्थानकातून सकाळच्या गर्दीच्या वेळी लोकल पकडण्यासाठी पादचारी पूल चढून जाण्याची कसरत कमी होणार आहे. त्याचवेळी बॅग घेऊन बाहेरचे गावी निघालेल्या प्रवाशांना देखील या सरकत्या जिन्याचा फायदा होणार आहे.

## प्रवाशांना हॉटेल व पेट्रोल पंपाचा आधार

# महामार्गावर स्वच्छतागृहांअभावी गैरसोय; महिला, ज्येष्ठांचे हाल

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

असंख्य चाकरमानी व प्रवासी जिल्ह्यातील विविध ठिकाणी कामानिमित्त प्रवास करतात. मात्र येथून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांची एक वेगळीच गैरसोय होत आहे. ती म्हणजे या महामार्गांवर शासनातर्फे कोठेही स्वच्छतागृह उभारण्यात आलेले नाहीत. परिणामी स्वच्छतागृहा अभावी प्रवाशांची गैरसोय व कुचंबणा होते. महिला व ज्येष्ठांचे तर खूप हाल होतात. परिणामी प्रवाशांना येथील हॉटेल व पेट्रोल पंपाचा आधार घ्यावा लागतो.

तळकोकणातून पुणे व मुंबईकडे अनेक चाकरमानी देखील ये जा करत असतात. शिवाय जिल्ह्यातील समुद्र किनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, धार्मिक स्थळे पाहण्यासाठी पर्यटकांचा ओघ कायम सुरू असतो. जिल्ह्यातून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग, मुंबई बंगलोर महामार्ग आणि माणगाव दिघी पोर्ट हे मोठे मार्ग जातात. शिवाय इतरही राज्य महामार्ग आहेत. दिवाळीला जिल्ह्यात पर्यटकांची मोठी गर्दी होती. तसेच नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणात चाकरमानी गावी आले होते.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम अजूनही सुरू आहेत. त्यामुळे या मार्गाची पुरती दुरवस्था झाली आहे. मोठाले खड्डे पडले आहेत. त्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी देखील होते. यामुळे प्रवासात इच्छित स्थळी पोहचण्यासाठी नियमित लागणाऱ्या वेळेपेक्षा अधिक वेळ लागत आहे. परिणामी तासनतास प्रवाशांना वाहनातच बसावे लागते. अशावेळी येथे कुठेही स्वच्छतागृह नसल्याने त्यांची खूप गैरसोय होत आहे.



**बसस्थानकातील स्वच्छतागृहांची दुरवस्था**

**परिवहन महामंडळाच्या स्थानकातील स्वच्छतागृहांची दुरवस्था झाली आहे. शिवाय, या ठिकाणी चांगली स्वच्छतादेखील केली जात नाही. परिणामी, परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचीदेखील गैरसोय होते.**

महामार्गांवर स्वच्छतागृह नसल्याने प्रवाश्यांना पोट धरून बसावे लागते. त्यात खराब रस्ते आणि खड्ड्यांमध्ये वाहने आदळतच जातात. अशा वेळी प्रवाश्यांचा जीव अधिकच कासावीस होतो. त्यांना वेळीच स्वच्छतागृह न मिळाल्याने खूपच हाल होतात. परिणामी काहींना तर मुतखड्याचा त्रास देखील संभवतो.या साठीच महामार्गावर ठिकठिकाणी स्वच्छतागृह उभारण्याची नितांत आवश्यकता आहे.

लांबचा प्रवास करताना नैसर्गिक विधी करण्यासाठी त्यांना कोणताच पर्याय राहत नाही. सगळ्यात जास्त गैरसोय आणि हाल होतात ते वृद्ध व महिलांचे. अशा वेळी महामार्गावर असणाऱ्या हॉटेलचा सहारा या प्रवाश्यांना घ्यावा लागत आहे. तर काही वेळेला पेट्रोल पंपाचा आधार घ्यावा लागतो. पण पेट्रोल पंपावर मोठ्या प्रमाणात येणाऱ्या प्रवाशांसाठी ही सुविधा उपलब्ध नाही.

**नियमांना फाटा**

वास्तविक रोड टॅक्स व इतर कर भरूनही या मार्गांवर प्रवाशांना नैसर्गिक विधी करण्यासाठी पदरमोड करावी लागत आहे. स्वच्छ भारत अभियान मोठ्या जोमाने राबविले जात असताना या महामार्गांवर शासनाकडून स्वच्छतागृहाची उभारणी करण्यात आलेली नाही. नियमाप्रमाणे येथे काही ठराविक अंतरावर स्वच्छतागृह उभारणे बंधनकारक आहे. मात्र, या महत्वाच्या सुविधेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होताना दिसत आहे.

> महामार्गावरील ही विदारक परिस्थिती सुधारणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासनाने म्हणजेच एनएचएआय, एमएसआरडीसी, सार्वजनिक बांधकाम विभागाने या मार्गांवर स्वच्छतागृह बांधणे गरजेचे आहे. ही स्वच्छतागृह प्रवाश्यांसह महामार्गावर काम करणाऱ्या कामगारांना देखील उपयुक्त ठरतील. त्यामुळे ठेकेदाराने देखील यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. प्रशासनाबरोबर खासगी कंपन्या किंवा स्वयंसेवी संघटनांनी देखील ही सुविधा देण्यास हरकत नाही. या ठिकाणी नाममात्र शुल्क भरण्यास देखील प्रवासी तयार होऊ शकतात. याबरोबरच शहराच्या धर्तीवर महामार्गाच्या शेजारी फिरते टॉयलेट ठेवून प्रवाशांची गैरसोय दूर करता येऊ शकते. मात्र, या सगळ्यासाठी गरज आहे ती प्रशासकीय इच्छाशक्तीची.
>
> – सुनील साठे, अध्यक्ष, मनसे, सुधागड तालुका

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# शिंद्यांनी केली सुटका...

'मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते,' अशा सुरेश भटांच्या काव्यपंक्ती आहेत. त्या धर्तीवर शिंद्यांनी केली सुटका, म्हसक्यांनी छळले होते, अशी भाजपची अवस्था होती. २०१९ नंतर ठाकऱ्यांनी युती तोडली आणि काँग्रेससोबत जाऊन ते मुख्यमंत्री झाले. यंदाच्या विधानसभा निकालानंतर, एकनाथ शिंदेदेखील त्याच मार्गाने जातात की काय म्हणून भाजपचा जीव गेले चार दिवस टांगणीला लागला होता. अखेर बुधवारी पत्रकार परिषद घेऊन आपण मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीतून माघार जाहीर केली. दिल्लीतील नेत्यांचा निर्णय आपल्याला मान्य राहील असे उद्‌गार त्यांनी काढल्याबरोबर भाजपवाल्यांनी सुटकेचा निश्वास टाकल्याचा आवाज सर्व महाराष्ट्रभर ऐकू आला. या घोषणेनंतर लगेच चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात पत्रकार परिषद घेऊन शिंदे यांचे तीन-तीन वेळा आभार मानले. नरेंद्र मोदी व अमित शाह यांचा निर्णय आपल्यासाठी अंतिम असेल असे शिंदे यांनी सांगितल्यामुळे तर बावनकुळे यांना उत्साहाचे भरते आले होते. याबद्दल शिंदे यांचा आपल्याला अभिमान वाटत असल्याचे ते म्हणाले. भाजपवाले आपला पक्ष जगातील सर्वात मोठा आहे असे सांगतात. यंदाच्या निवडणुकांनंतर, महाराष्ट्रात मनात आणले तर ते स्वबळावर सत्तेत येऊ शकतील अशा टप्प्यात आहेत. त्यासाठी जो काय दहा-बारा अपक्षांचा पाठिंबा लागेल तो मिळवणे अजिबात कठीण नाही. मोदी नावाचे विश्वगुरु आणि अमित शाह नावाचे चाणक्य या पक्षाचे नेते आहेत. विरोधकांचे होत्याचे नव्हते करून टाकणारे कारस्थानी अशी कीर्ती त्यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये आपल्या कर्तृत्वाने कमावली आहे. अशा या बलाढ्य आणि भीतीदायक पक्षाचा जीव शिंदे यांच्यासारख्या एका प्रादेशिक नेत्यापायी टांगणीला लागावा हे चित्र फारच मनोरंजक होते. आता शिंदे काय करतात या भीतीने त्यांच्या नेत्यांची वाचा बसली होती. सांगताही येत नाही व सहनही होत नाही अशी ही स्थिती होती.

## मिडियामार्फत दबाव

विधानसभा निवडणुकांचा निकाल शनिवारी लागला. पण गुरुवार उजाडला तरी नवीन मुख्यमंत्र्याचा निर्णय महायुतीला घेता आला नव्हता. हा २०१४ किंवा २०१९ चा काळ असता तर भाजपने शिंदे यांना केव्हाच गुंडाळले असते. पण मधल्या काळात बरेच फटके खाऊन झाले आहेत. एका अर्थाने उद्धव यांच्या बंडामुळेच शिंदे यांना मुख्यमंत्रिपद मिळाले व आताही त्यांना झटकून टाकणे दिल्लीश्वरांना शक्य झाले नाही. दुधाने पोळल्यावर ताकही फुंकून प्यावे तसा हा प्रकार होता. वास्तविक कोणत्याही राज्यात नव्याने निवडून येणारे नेते, अगदी बिगर-भाजपचे असले तरी, दिल्लीत जाऊन लगोलग मोदी वगैरेंची भेट घेतात. कालच झारखंडचे प्रस्तावित मुख्यमंत्री हेमंत सोरेन मोदींना जाऊन भेटले. शिंदे हे मात्र दिल्लीत गेले नाहीत. एरवी ते सतत मोदींच्या नावाचा जप करीत असतात. पण यावेळी एक तर ते गेले नाहीत किंवा मोदींनी त्यांना वेळ दिली नाही. आता मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीतून बाहेर होत असल्याचे सांगितल्यावर शिंदे गुरुवारी पहिल्यांदा दिल्लीत गेले. मधल्या काळात भाजपच्या कोणाही नेत्यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत त्यांच्याशी काहीही चर्चा केली नाही. नरेश म्हस्के वगैरे लोक शिंदेच मुख्यमंत्री झाले पाहिजेत असे म्हणत राहिले. शिंदे यांच्या पत्नी त्र्यंबकेश्वरला जाऊन तसे गाऱ्हाणे घातल्याच्या बातम्या झाल्या. म्हणजे मिडियातील प्रसिध्दीच्या मार्फत भाजपवर दबाव आणण्याचा हा सर्व प्रयत्न होता. शिंदे व भाजप यांच्यात कोणताही थेट संवाद नव्हता. एरवी, अशा चर्चा पडद्याआड करायच्या व अंतिम निर्णय तेवढा जाहीर करायचा ही महायुतीतील पद्धत आहे. त्यामुळेच या तिन्ही पक्षांत जागावाटपामध्ये प्रचंड मतभेद असूनही ते कधी बाहेर आले नाहीत. आघाडीपेक्षाही युतीत बंडखोरी अधिक होती. पण त्याची वाच्यता झाली नाही. यावेळी मात्र शिंदे यांना अशा वाटाघाटी करण्यासाठी तोंडही उघडता आले नाही. कारण, अशा बैठकाच भाजपने होऊ दिल्या नाहीत.

## देवाभाऊंची देवदिवाळी

शिंदे यांना अंतिमतः माघार घ्यावी लागणार हे उघड होते. संख्याबळ भाजपच्या बाजूचे होते. पण तरीही मिडियाच्या आधारे आपली बाजू चार दिवस रेटून धरण्याचा प्रयत्न केला आणि भाजपला तो एकदम उडवून लावता आला नाही. भाजपने सरकार स्थापण्याची आपल्याला घाई आहे असे अजिबात दाखवले नाही. अजूनही दोन-तीन दिवस यात काढले जातील व बहुदा देवदिवाळीसोबतच महाराष्ट्रात देवाभाऊ सत्तेत बसतील. थोडक्यात शिंदे आपली ताकद दाखवण्यात यशस्वी झाले. मात्र अंतिम विजय भाजपचा झाला. अर्थात, तसा तो होणार होताच. पण त्याला किती वेळ लागणार हाच प्रश्न होता. बावनकुळे यांची प्रतिक्रिया पाहता, शिंदे यांनी अजून अडवून धरले असते तर कदाचित त्यांना दिल्लीत बोलावून त्यांना योग्य ती समज दिली गेली असती. ते करण्याचा प्रसंग टळला याबद्दल दिल्लीतले नेते मनोमन आनंदित असतील. मात्र, या प्रकारात मराठी नेते ज्या सहजपणे दिल्लीला शरण गेले आहेत ते खेदजनक आहे. पूर्वी काँग्रेसचा कारभार दिल्लीतून चाले म्हणून त्यांच्यावर टीका होई. पण आता भाजपच नव्हे तर, मराठी माणसाच्या स्वाभिमानाच्या गप्पा करणारे शिंदे व अजितदादा दिल्ली देईल तो निर्णय आपल्याला मान्य राहील असे म्हणत आहेत. उद्या दिल्लीने यांचे उपमुख्यमंत्रिपद काढले आणि अजितदादांना समजा अर्थ खाते दिले नाही तरी ते स्वीकारावे लागणार आहे. गृह, अर्थ, नगरविकास, जलसंपदा इत्यादी महत्वाची खाती आपल्याकडे ठेवण्याचा भाजपचा कल असेल व तो रास्तही आहे. भाजपचे संख्याबळच इतके आहे की, त्याच्यापुढे काहीही अपील चालणारे नाही. इथून पुढे शिंदे यांची दादागिरी संपणार असून आपल्या आमदारांना पैशांच्या खाणी उघडून देण्याचे अधिकारही जाणार आहेत. त्यामुळे आता कारभार भाजपच्या तंत्राने होईल व राजकीय सोयही भाजपची पाहिली जाईल. गैरसोयीचे असेल तेव्हा शिंदे आणि दादा यांना वाळीत टाकले जाईल, त्यांची जागा दाखवून दिली जाईल व यथावकाश हाकलूनही काढले जाईल.

---

विचार

# दिलासादायक उद्योगचित्र

**_गेल्या दहा वर्षांमध्ये प्राप्तिकर भरणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. ऑक्टोबरमध्ये देशातील एकूण दुचाकी विक्रीत १४.२ टक्क्यांनी वाढ झाली. दरम्यान, स्मार्टफोन निर्यातीचे मागील विक्रम मोडीत काढत आयफोन निर्यातीने मागील सात महिन्यांमध्ये साठ हजार कोटी रुपयांचा टप्पा गाठला. भारताच्या सौर उत्पादनांची निर्यात गेल्या दोन वर्षांमध्ये २० पटींनी वाढली. असाच विकासवेग अन्य क्षेत्रांमध्येही पहायला मिळत आहे._**



**कैलास ठोळे**

मोदी सरकारच्या कार्यकाळात मध्यम वर्गीयांवरील कराचा बोजा कमी झाला आहे. विशेषतः २० लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या मध्यमवर्गावरील कराचा बोजा कमी होत आहे, तर ५० लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या प्राप्तिकराचे परतावे दाखल करणाऱ्यांच्या संख्येत पाच पटींनी वाढ झाली आहे. गेल्या दशकात प्राप्तिकर भरणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे ही आकडेवारी दर्शवते. सध्याच्या सरकारने लागू केलेल्या करचोरी आणि काळ्या पैशाविरोधातील कडक कायद्यांमुळे करदात्यांची संख्या वाढल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. प्राप्तिकर विभागाच्या सूत्रांनुसार, ५० लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न दाखवणाऱ्या लोकांची संख्या २०२३-२४ मध्ये ९.३९ लाखांपेक्षा जास्त झाली आहे. हा आकडा २०१३-१४ मधील १.८५ लाखांपेक्षा पाचपट अधिक आहे. ५० लाखांपेक्षा जास्त कमाई करणाऱ्यांचे प्राप्तिकर दायित्व २०१४ मध्ये २.५२ लाख कोटी रुपयांवरून २०२४ मध्ये ९.६२ लाख कोटी रुपयांपर्यंत म्हणजेच ३.२ पटीने वाढले आहे. भारतीय दुचाकी बाजारासाठीही एक आनंदाची बातमी आहे. केवळ ऑक्टोबर महिन्यात दुचाकींची विक्री २१.६४ लाख युनिट्सवर पोहोचली. ऑक्टोबर २०२३ मध्ये हा आकडा १८.९६ लाख होता. 'सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स'ने या संदर्भात नवी आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार ऑक्टोबरमध्ये देशातील एकूण दुचाकी विक्रीत १४.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये दसरा आणि दिवाळी या दोन प्रमुख सणांमुळे चांगली खरेदी झाल्याचे ऑटोतज्ज्ञांचे म्हणणे आहे. पारंपारिकपणे, या काळात लोकांना वाहने खरेदी करण्याची इच्छा असते. या उत्सवाचा वाहन उद्योगावर सकारात्मक परिणाम होत आहे.

ऑक्टोबर २०२४ मध्ये 'पॅसेंजर व्हेईकल'ने ३.९३ लाख युनिट्सची आतापर्यंतची सर्वाधिक विक्री नोंदवली. या दरम्यान तीनचाकी वाहनांच्या विक्रीत गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरच्या तुलनेत ०.७ टक्क्यांची घट झाली आहे. काही बाजार विश्लेषकांच्या मते दुचाकींच्या विक्रीत वाढ होण्याचे कारण ग्रामीण भागातील लोकांचे वाढलेले उत्पन्न आहे. एकूणच, भारतीय ऑटोमोबाईल उद्योगाने ऑक्टोबर २०२४ मध्ये विक्रीच्या बाबतीत संमिश्र कामगिरी पाहिली. 'सियाम'च्या मते, ऑक्टोबरमध्ये भारतात एकूण ३,६७,१८५ प्रवासी वाहनांची निर्मिती झाली. यामध्ये १,२८,०९७ प्रवासी कार, २,२६,९२४ युटिलिटी वाहने आणि १२,१६४ व्हॅनचा समावेश आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये, भारतात १,५६,२५० प्रवासी कार, २,१३,३८० युटिलिटी वाहने आणि १२,७५९ व्हॅन्सची निर्मिती झाली. म्हणजेच, प्रवासी कार आणि व्हॅनच्या उत्पादनात अनुक्रमे १८ टक्के आणि ४.७ टक्क्यांची घट दिसून आली आहे; परंतु ऑक्टोबर २०२४ मध्ये युटिलिटी वाहनांच्या उत्पादनात ६.३ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. असाच ट्रेंड देशांतर्गत विक्रीमध्येही दिसून आला आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये २,२५,९३४ युटिलिटी वाहने विकली गेली, तर ऑक्टोबर २०२३ मध्ये १,९८,३५६ युटिलिटी वाहने विकली गेली, म्हणजेच १३ टक्के वाढ झाली. 'ह्युंदाई मोटर इंडिया' वाहन उद्योगातील तेजीमुळे उत्साहित आहे. वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी ह्युंदाईने अलीकडेच पुण्यात नवीन प्लांट बांधून उत्पादन क्षमता वाढवली. भारतीय बाजारपेठेचे चित्र लक्षात घेऊन धोरणात्मक उत्पादन केंद्र तयार करत असून मध्य पूर्व, आफ्रिका, दक्षिण आशिया आणि लॅटिन अमेरिकेत वाढणाऱ्या वाहनांच्या मागणीचा फायदा घेण्याची तयारी ह्युंदाई करत आहे. दुसरीकडे, भारताच्या मोबाईल मार्केटमध्येही विक्रमी व्यवसाय होताना दिसत आहे. गेल्या सात महिन्यांमध्ये भारतात बनवलेल्या आयफोन्सच्या निर्यातीचा विक्रम सात अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. स्मार्टफोन निर्यातीचे मागील सर्व विक्रम मोडीत काढत आयफोन निर्यातीने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांमध्ये (एप्रिल-ऑक्टोबर) साठ हजार कोटी रुपयांचा टप्पा गाठला आहे. याचा अर्थ असा की दर महिन्याला सरासरी एक अब्ज डॉलरचे आयफोन निर्यात केले जातात. 'ॲपल' भारतातून केवळ आयफोन १४, १५ आणि १६ ची निर्यात करत नाही, तर या वर्षी ऑक्टोबरमध्ये स्थानिक पातळीवर आयफोन १६ प्रो आणि प्रो मॅक्सचे उत्पादन सुरू केल्यानंतर या मॉडेल्सचीही निर्यात करत आहे. प्रो आणि प्रो मॅक्स मॉडेल्सचे मूल्य इतर आयफोन मॉडेल्सच्या तुलनेत सुमारे दीड ते दुप्पट जास्त आहे. त्याच वेळी 'सायबर मीडिया रिसर्च' या मार्केट रिसर्च फर्मने म्हटले आहे की जुलै-सप्टेंबर तिमाहीमध्ये भारतातील टॅब्लेट पीसी बाजार वार्षिक आधारावर ४६ टक्क्यांनी वाढला आहे. २० ते तीस हजारांच्या दरम्यान असलेल्या टॅब्लेटच्या किमतीत गेल्या वर्षीच्या तुलनेत १०८ टक्क्यांनी लक्षणीय वाढ झाल्याचे अहवालात म्हटले आहे. ३४ टक्के शेअरसह 'ॲपल'च्या 'आयपॅड'ने या विभागाचे नेतृत्व केले. भारत सौर उर्जेच्या क्षेत्रातही सतत वाढ नोंदवत आहे. भारताच्या सौर उत्पादनांची निर्यात गेल्या दोन वर्षांमध्ये २० पटींनी वाढून दोन अब्ज डॉलर झाली आहे. एका अहवालानुसार, २०२२ ते २०२४ या काळात भारताच्या सौर फोटोव्होल्टेइक (पीव्ही) उत्पादनांच्या निर्यातीत २३ पट वाढ झाली आहे. 'इन्स्टिट्यूट फॉर एनर्जी इकॉनॉमिक्स अँड फायनान्शियल ॲनालिसिस' आणि 'जेएमके रिसर्च अँड ॲनालिसिस'च्या अहवालानुसार भारतातील सौर उत्पादनांच्या क्षेत्रात ही लक्षणीय प्रगती आहे. भारतीय सोलर पीव्ही निर्यातीसाठी अमेरिका एक प्रमुख बाजारपेठ म्हणून उदयास आली आहे. २०२३ आणि २०२४ या दोन्ही वर्षांमध्ये भारतीय सौर पीव्ही निर्यातीपैकी ९७ टक्क्यांहून अधिक अमेरिकेला गेली. 'एमएनआरआय'च्या मते, ४५३ गीगावॅटच्या एकूण वीजनिर्मिती क्षमतेमध्ये अक्षय ऊर्जेचा वाटा वाढून ४६ टक्के झाला आहे. देशाची एकूण अक्षय ऊर्जा क्षमता २०० गीगावॅटच्या पुढे गेली आहे. भारताची अक्षय ऊर्जा क्षमता केवळ एका वर्षात २४.२ गीगावॅट (१३.५ टक्के) ने वाढून ऑक्टोबर २०२४ मध्ये २०३.१८ गीगावॅटवर पोहोचली आहे. दुसरीकडे, भारतीय दागिन्यांच्या ई-कॉमर्स मार्केटमध्ये जबरदस्त व्यवसाय होताना दिसत आहे. विक्रेते आणि खरेदीदार ऑनलाइन ई-कॉमर्सचा आनंद घेत आहेत. एका अहवालानुसार, ज्वेलरी ई-कॉमर्स मार्केटने तीन वर्षांमध्ये २२ अब्ज डॉलरचा व्यवसाय केला आहे. पुढील दोन-तीन वर्षांमध्ये ऑनलाइन विक्री वीस टक्क्यांपर्यंत वाढेल. ती सध्या एक टक्का आहे. सोन्याच्या खरेदीच्या पारंपरिक प्रवृत्तीला मोठे आव्हान पेलावे लागणार आहे, असे या व्यवसायातील तेजीवरून दिसून येते.

भारतातील सणासुदीने विक्रमी व्यवसाय केला आहे. सणासुदीच्या हंगामातील विक्री १२ टक्क्यांनी वाढून १.१८ लाख कोटी रुपयांवर पोहोचल्याचे एका अहवालात म्हटले आहे. यामध्ये केवळ मोठ्याच नाही, तर छोट्या शहरांचाही समावेश आहे. फॅशनविश्वातील विक्रीमध्ये सर्वाधिक वेगाने वाढ झाल्याचे या अहवालात सांगण्यात आले आहे. सामान्य व्यावसायिक महिन्यांच्या तुलनेत सणांच्या काळात विक्री तिपटीने वाढली आहे. फॅशनशिवाय इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, घरगुती वस्तू आणि किराणा मालाची मोठ्या प्रमाणात खरेदी झाली आहे. अंतराळ गुंतवणुकीत भारताचे उड्डाण इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे प्रमुख एस. सोमनाथ यांनी एक महत्त्वाची माहिती देताना सांगितले की 'इस्रो'ने खर्च केलेल्या प्रत्येक रुपयाला २.५ रुपये परतावा मिळतो. अंतराळ क्षेत्राने २०१४ ते २०२४ दरम्यान सकल देशांतर्गत उत्पादनात ६० अब्ज डॉलरचे योगदान देऊन लाखो रोजगार निर्माण केले आहेत. एस. सोमनाथ म्हणाले की या कामगिरीवरून हे दिसून येते की अंतराळ क्षेत्रात भारत जगात आघाडीवरचा देश म्हणून उदयास आला आहे. २०२३ पर्यंत भारतीय अंतराळ क्षेत्राचा महसूल ६.३ अब्ज डॉलर्स इतका वाढला आहे. अवकाश क्षेत्राने ४.७ दशलक्ष नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. त्यात सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील ९६ हजार नोकऱ्यांचा समावेश आहे.

एकंदरीत, अनेक आघाड्यांवर देशातील उद्योग आणि सेवा क्षेत्राची वेगवान वाटचाल सुरु आहे. ही गती पुढील काही वर्षे अशीच सुरु राहण्याची अपेक्षा आहे.

---

आजकाल

# इस्रायलची युद्धबंदी कितपत टिकणार?

इस्रायल आणि लेबनॉनमधील अतिरेकी संघटना हेजबोलामध्ये युद्धबंदी घडविण्यात अमेरिका आणि फ्रान्सला अखेर यश आले. स्थानिक वेळेनुसार बुधवारी पहाटेपासून युद्धबंदी अमलात आली असली, तरी अद्याप दक्षिण लेबनॉन आणि उत्तर इस्रायलमधील तणावपूर्ण वातावरण शांत होण्यास काही काळ जावा लागेल.

१४ महिन्यांपूर्वी गाझा युद्ध सुरू झाल्यापासून लेबनॉनमधील हेजबोला या दहशतवादी लष्करी संघटनेने इस्रायलच्या उत्तर सीमेवर कारवाया सुरू केल्या होत्या. हमासवरील कारवाईवरून इस्रायली लष्कराचे सैन्य विचलित करण्याचा अर्थातच हेजबोलाचा हेतू होता. हेजबोलाच्या हल्ल्यांना इस्रायलकडून प्रत्युत्तर दिले जात असले, तरी सप्टेंबरमध्ये बिन्यामिन नेतान्याहू यांच्या युद्ध मंत्रिमंडळाने आपले धोरण बदलले आणि लेबनॉनमध्ये सैन्य घुसविले. लेबनॉनची राजधानी बैरूतसह देशाच्या दक्षिणेकडे असलेले हेजबोलाचे तळ इस्रायलने उद्‌ध्वस्त केले. हेजबोलाचे तमाम बडे नेते ठार झाल्यानंतर अखेर मंगळवारी इस्रायल आणि हेजबोलाने युद्धबंदीचा करार मान्य केला.

अमेरिका आणि फ्रान्सच्या मध्यस्थीने अस्तित्वात आलेल्या युद्धबंदी करारानुसार इस्रायल आणि हेजबोला पुढील दोन महिने शस्त्रे खाली ठेवतील. या काळात दक्षिण लेबनॉनमधून इस्रायलचे सैन्य माघारी जाईल आणि हेजबोलाकडील शस्त्रे काढून घेतली जातील. या संपूर्ण प्रक्रियेवर अमेरिकेने नियुक्त केलेल्या आंतरराष्ट्रीय पथकाची देखरेख असेल. दक्षिण लेबनॉनमध्ये शांतता कायम राहावी, यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या शांतीसेनेचे सैनिक तैनात केले जातील. या युद्धबंदी करारात गाझा युद्धाचा उल्लेख करण्यात आला नसल्याने हमासविरोधातील इस्रायलची लष्करी कारवाई सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. उलट उत्तर सीमेवर उसंत मिळाल्यानंतर आता इस्रायली लष्कराला गाझावर अधिक लक्ष केंद्रित करता येणार आहे. असे असले तरी इस्रायलने विस्थापित झालेल्या नागरिकांनी तातडीने परत येऊ नये, असा इशारा दिला आहे.

बुधवारी पहाटेपासून युद्धबंदी अमलात येताच बैरूतसह दक्षिण लेबनॉनच्या उद्‌ध्वस्त झालेल्या भागांतील नागरिक परत येऊ लागले आहे. देशाच्या उत्तरेकडे किंवा पश्चिमेकडील सीरियामध्ये आश्रय घेतलेल्या नागरिकांचे दक्षिणेकडे निघालेले जत्थे आणि गाड्यांच्या रांगा दिसत असल्या, तरी इस्रायलने या नागरिकांना सावधगिरीचा इशारा दिला आहे. हेजबोलाने युद्धबंदीचे उल्लंघन केल्यास आपण हल्ला करू, असे इस्रायलचे म्हणणे आहे. युद्धबंदी करारात तशी अट असल्याचे नेतान्याहू यांचे म्हणणे आहे, तर हेजबोला आणि लेबनॉन सरकारने अशी कोणतीही अट नसल्याचे म्हटले आहे. इस्रायलच्या या इशाऱ्यामुळे युद्ध थांबणार असले, तरी तणाव इतक्या लवकर निवळण्याची शक्यता नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या भागात दीर्घकाळ शांतता प्रस्थापित व्हावी, असे वाटत असेल, तर संयुक्त राष्ट्रांना अधिक सजग राहावे लागणार आहे.

मंगळवारी अस्तित्वात आलेला युद्धबंदी करार हा संयुक्त राष्ट्रांच्या 'ठराव क्रमांक १७०१'नुसार झाला आहे. २००६मध्ये इस्रायल आणि हेजबोलामध्ये महिनाभर युद्ध सुरू होते. त्यानंतर संयुक्त राष्ट्रांनी हा ठराव एकमताने मंजूर केला होता. मात्र या ठरावाची पूर्णपणाने अंमलबजावणी कधीच होऊ शकली नाही. आजच्या इस्रायल-हेजबोला संघर्षाचे मूळ हे या ठरावाच्या अपयशात दडले आहे. असे असले तरी लेबनॉनमधील संघर्ष टाळण्यासाठी हा ठरावच सध्यातरी सर्वांत मोठा आधार असल्याचे मानले जाते. या ठरावानुसार दक्षिण लेबनॉनमधून इस्रायलने पूर्ण माघार घ्यायची आणि हेजबोलाने लितानी नदीच्या पलिकडे जायचे, असे निश्चित झाले. दोन्ही देशांच्या सीमा निश्चित करणारी 'निळी रेषा' संयुक्त राष्ट्रांनी आखून दिली. 'युनिफिल' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या शांतीसेनेने लेबनॉनमध्ये आपले अस्तित्व वाढविले. मात्र जसजसा काळ गेला, तसतसा या ठरावाचा परिणामही ओसरला. दक्षिण लेबनॉनमध्ये हेजबोलाने अस्तित्व वाढविले आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलनेही 'सर्जिकल स्ट्राइक'सारख्या कारवाया सुरू केल्या. आता अस्तित्वात आलेली दीर्घकाळ टिकावी असे अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रांना वाटत असेल, तर संयुक्त राष्ट्रांना पूर्वी केलेल्या या चुका टाळाव्या लागतील.

येत्या दोन महिन्यांत लेबनॉनमध्ये खरोखर शांतता निर्माण झाली, तर अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रांना हमास-इस्रायल युद्धबंदीसाठी अधिक बळ मिळेल हे निश्चित. हेजबोलाप्रमाणेच हमासचेही अनेक बडे म्होरके मारले गेले आहेत. त्यामुळे आता ओलिसांची सुटका करून गाझामधील युद्ध थांबविण्याला प्राधान्य दिले जाईल, असे मानले जात आहे. अर्थात, इस्रायलमधील देशांतर्गत राजकारणाचा विचार करता, नेतान्याहू यांना युद्धबंदीला राजी करणे अमेरिकेला कठीणच जाणार आहे. कारण युद्ध थांबल्यानंतर नेतान्याहू यांची खुर्ची कधीही जाऊ शकेल, अशी स्थिती आहे. दुसरीकडे अमेरिकेतही जानेवारीत सत्तांतर होणार असल्याने ट्रम्प प्रशासनाची गाझा युद्धाबाबत भूमिकाही कळीचा मद्दा ठरणार आहे.

---

लोकसंसद

## पॅन कार्ड आता अधिक नवीन प्रगत स्वरूपात

भारतातील समस्त करदात्यांसाठी एकमेव 'कायम खाते क्रमांक' कार्ड म्हणून महत्त्वाचा दस्तऐवज असलेले पॅन कार्ड (पर्मनंट अकाउंट नंबर कार्ड) आता लवकरच नव्या स्वरूपात येत आहे. या संदर्भात केंद्र सरकारने पॅन २.० प्रोजेक्टला नुकतीच मान्यता दिली असून या प्रोजेक्टसाठी सरकारकडून १ हजार ४३५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पॅन २.० प्रोजेक्ट अंतर्गत नव्याने बनवलेले पॅन कार्ड ही आधीच्या पॅन १ .० प्रोजेक्टची सुधारित आवृत्ती असून त्यात क्यू.आर. कोड (क्विक रिस्पॉन्स कोड) समाविष्ट करण्यात आला आहे. क्यू.आर. कोडच्या समावेशामुळे स्कॅनिंगद्वारे वापरकर्त्याचा तपशील तात्काळ आणि अचूकपणे मिळू शकेल. तसेच विविध आर्थिक प्रक्रिया, आर्थिक व्यवहार अधिक सुलभ होतील. पूर्वीच्या पॅन कार्डपेक्षा पॅन कार्ड २.० हे तांत्रिकदृष्ट्या अधिक सुरक्षित असेल. त्यामुळे पॅन कार्डधारकांना कोणत्याही प्रकारच्या ऑनलाइन फसवणुकीपासून संरक्षण मिळेल. विशेष म्हणजे नवीन पॅन कार्डाचा पॅन नंबर बदलला जाणार नसून विद्यमान पॅन नंबरच अस्तित्वात राहणार आहे. तसेच या नवीन पॅनकार्डसाठी कोणतीही फी किंवा शुल्क आकारले जाणार नसून हे पॅन कार्ड २.० पॅन कार्डधारकांच्या स्थायी पत्त्यावर पूर्णपणे मोफत घरपोच दिले जाणार आहे. सध्याच्या घडीला देशात सुमारे ७८ कोटी पॅन कार्डधारक असून नवीन सुधारित पॅन कार्डमधील आधुनिक तंत्रज्ञान आधारित डेटा सुसंगतीमुळे त्यांना आर्थिक व्यवहार करणे अधिक सुलभ होणार आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२९ नोव्हेंबर**

**१८३५: -** कवी, प्राचीन भारतीय वाङ्:मयाचे अभ्यासक, षड्दर्शनज्ञ महादेव मोरेश्वर कुटे यांचा जन्म. मराठी साहित्य जगतामध्ये 'राजा शिवाजी' चे जनक. याशिवाय मन, राजाराम आणि ऋषी ही त्यांची काव्यरचना प्रसिद्ध, **१८६२ :-** कवी विष्णू गणेश नेने यांचा जन्म. अध्यात्माचा गाढा अभ्यास असणाऱ्या नेत्यांनी 'साम ऑफ लाइफ' चे जीवित स्तोत्र' या नावाने आर्याबध्द भाषांतर केले. 'पंचीकरण' या गुजराथी ग्रंथाचे मराठीत भाषांतर. याशिवाय विष्णूस्तुती, जगदीशस्तोत्र, ईशदर्शन आदी काव्यरचना. गुरु काका पुराणिक यांचे पद्यमय चरित्र ही ११ हजार आर्या असलेली प्रदीर्घ काव्यरचना त्यांनी रचली. **१८६५:-** संतकवी नाईक माणिक मनोहर हरकुडे यांचे निधन. मराठीसह हिंदी, उर्दू व कानडी भाषांतून त्यांनी पद्यरचना केली. **१८९६ :-** कवी, कथा-कादंबरी - नाटककार विनायक लक्ष्मण बर्वे यांचा जन्म मुचकुंदहरी' ही कोकणाच्या ग्रामीण जीवनावर बेतलेली कांदबरी आणि 'मातेश्वरी' ही नवलकथा त्यांनी लिहिली. **१९०७:-** कवी, कादंबरीकार, चरित्रकार, संपादक, बालसाहित्यिक गोपीनाथ गणेश तळवलकर यांचा जन्म. 'दुर्वांकुर' संग्रहात 'रायबा', 'मातृहृदय', 'रानपाखरा' या लोकप्रिय कविता, तर 'सारसबाग' या संग्रहात त्यांची गाजलेली बालगीते समाविष्ट आहेत. 'आशियाचे धर्मदीप व ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व' ही पुस्तके, चार कादंबऱ्या व बुध्दायन' हे खंडकाव्य त्यांच्या नावावर आहे. ७ जून २००० रोजी निधन झाले. **१९१७ :-**लेखक, बालसाहित्यिक भगवंत रंगनाथ अक्कलकोटकर याचा जन्म. 'जीवनरंग', 'मंगलभेट', 'त्यांना मूल झालं' ह्या कादंबऱ्या तसेच 'लग्नाची हुंडी' ही नाटिका तसेच त्यांच्या बालसाहित्यात 'कांडू शिपाई', 'सुनंदाराणी', 'नंदापरी', 'उडत्या पादुका', 'एक होती चिमणी', 'प्रेमळ राक्षस', 'बोलकी मुंगी', 'सोन्याची किल्ली' आदी पुस्तके. **१९२६ :-** कवी टीकाकार, भाषांतरकार आणि केरळकोकीळ या मासिकाचे संपादक कृष्णाजी नारायण आठल्ये यांचे निधन. त्यांच्या नावावर ३७ पुस्तके आढळतात. त्यापैकी 'मराठ्यांची धामधुम', 'फाकडे तरवार बहादूर', 'कर्मयोग, भक्तियोग', 'राजयोग' तसेच 'समर्थांचे सामर्थ्य', 'लोकहितवादींचे चरित्र' ही त्यांची महत्त्वपूर्ण पुस्तके. **१९३३ :-** लेखक श्रीराम आत्माराम खुणे यांचा जन्म. 'चला नवेगाव बांधला' हा माहितीपर ग्रंथ त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९३६ :-** ज्योतिर्गणितज्ञ गोविंद सदाशिव आपटे यांचे निधन. 'गणकचुडामणी' या पदवीने सन्मानित झालेल्या झालेल्या गोविंदरावांच्या नावावर 'पंचांग - चिंतामणि' हा सुश्म सारणी ग्रंथ असून त्यातून एक वर्षाचे पंचांग तयार करता येते. 'सर्वानंद लाघव' मधून कोष्टकांशिवाय साधारण गणित जाणणाऱ्यांनाही गणित करता यावे या उद्देशाने लिहिला आहे. **१९३९ : -** 'राजनितिशास्त्र' या विषयावरील एक सिध्दहस्त लेखक बळवंत गणेश दाभोळकर यांचे निधन. पुण्याच्या दाभोळकर ग्रंथमालेचे ते संस्थापक होत. **१९४१ :-** कथाकार गोविंद नारायण खरे यांचे निधन. 'आंधळ्याची काठी', 'घडीचा पंखा', 'महाभारताची नायिका सती द्रौपदी', 'दंभकथा' इ. पुस्तके प्रसिध्द 'दर्भ' या टोपणनावाने त्यांनी 'करमणूक, लोकमित्र, रत्नाकर' आदी नियतकालिकातून कथा लिहिल्या. **१९४५:-** लेखक 'अपलम चपलम के. एन. नादुरकर याचा जन्म. 'छूमंतर', 'अप्सरा', 'अबोली', 'काव्यशिल्प', 'कामराज', 'गीतांजली', 'तुषार', 'निशिगंध', 'पराग' ह्या काव्यसंग्रहाच्या विविध कथा विविध वृत्तपत्रातून प्रसिध्द **१९५०:-** गेली तीन दशकाहून अधिक काळ लेखन कार्यरत असलेले लेखक रामकृष्ण विनायक अभ्यंकर यांचा जन्म. ह्यांचे 'दक्षिण भारत' हे पर्यटनावर, 'मंत्र व तंत्र', 'कुलदैवत', 'गणेशस्थाने', 'श्री अनघा माते पूजन' ह्या धार्मिक विषयांवरील पुस्तकांसह 'कन्येचे भाग्यविधाता' ही सामाजिक कादंबरीही त्यांच्या नावावर आहे. **१९५० :-** लेखक, मेघाली या त्रैमासिकाचे संपादक प्रकाश ज्ञानेश्वर जडे यांचा जन्म. 'रक्तफुल', 'सूर्य झेलताना' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**राजेंद्र म्हात्रे, वाढदिवस, पिंपळभाट, अलिबाग**
**राहुल म्हात्रे, वाढदिवस, पिंपळभाट, अलिबाग**

# रुग्णवाहिका व्यवस्थापनाचा ढिसाळ कारभार

## डहाणूतील गर्भवतीसह बाळाचा मृत्यू

**। पालघर । प्रतिनिधी ।**
**पालघर जिल्ह्याच्या आरोग्य यंत्रणेतील रुग्णवाहिका व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभारामुळे एका गर्भवतीसह तिच्या बाळाचा मृत्यू झाल्याचा खळबळजनक प्रकार बुधवारी (दि.२७) डहाणू येथे घडला आहे. या घटनेनंतर ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली असून संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.**



पिंकी डोंगरकर असे मृत महिलेचे नाव असून ती डहाणू तालुक्यातील सारणी येथे रहात होती. मंगळवारी (दि.२६) प्रसूती वेदना जाणवू लागल्यावर तिला उपचारासाठी कासा उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले होते. परंतु, तिची प्रकृती गंभीर असल्याने तिला गुजरातच्या वलसाड रुग्णालयात हलवण्याचा सल्ला कासा रुग्णालयातील डॉक्टरांनी दिला होता. त्यामुळे रात्रीपासून तिला वलसाड येथे हलविण्याचे प्रयत्न सुरू झाले. यासाठी १०८ क्रमांकाच्या आपत्कालीन रुग्णवाहिकेची मदत घेण्यासाठी प्रयत्न केले गेले. परंतु, ऑक्सिजनसारख्या अत्यावश्यक सुविधा नसल्याने रुग्णवाहिका तातडीने उपलब्ध झाली नाही. या विलंबामुळे गर्भवतीच्या जीवाला धोका निर्माण झाला.

दरम्यान, कासा उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली. मात्र, डॉक्टर आणि उपचार सुविधा उपलब्ध नसलेल्या रुग्णवाहिकेतून पिंकीला नेणे त्यांना चांगलेच महागात पडले आहे. सुविधा नसलेल्या रुग्णवाहिकेतून वलसाड येथे घेऊन जात असताना गुजरातच्या भिलाडजवळ पोहोचताच पिंकीचा आणि तिच्या पोटातील बाळाचा मृत्यू झाला. याआधीही आरोग्य व्यवस्था तसेच रुग्णवाहिका व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभाराचा फटका अशा अनेक गर्भवतींना बसला आहे. यातूनच त्या दगावल्याच्याही अनेक घटना समोर आल्या आहेत. मात्र, अनेक बळी गेल्यानंतरही सरकार याविषयी गंभीर नसल्याचा आरोप येथील ग्रामस्थांनी केला आहे.

> **पालघर जिल्ह्यात रुग्णवाहिका व्यवस्थेच्या हलगर्जीपणामुळे एका गर्भवती मातेचा आणि न जन्मलेल्या बाळाचा पोटातच मृत्यू होतो, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. तसेच, सरकारची 'लाडकी बहीण योजना' हीच आहे का? यासंदर्भात यापूर्वी विधिमंडळामध्ये आम्ही प्रश्न उपस्थित केला होता. आता मतदारांनी मला पुन्हा संधी दिली आहे. याबाबत पुन्हा विधिमंडळात या गंभीर विषयाबाबत आवाज उठवून याविषयी ठोस पावले उचलायला सरकारला भाग पाडणार.**
> **– आ. विनोद निकोले, माकप**

### १०८ सेवांच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह

**१०८ रुग्णवाहिका ही जीवनावश्यक सेवा असूनही ती तात्काळ उपलब्ध होण्यात अडथळा निर्माण होत आहे. तर, उधवा येथे रुग्णवाहिका असतानाही ऑक्सिजनच्या अभावामुळे ती पाठवण्यात उशीर झाला. अशा घटनेमुळे १०८ सेवांच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. रुग्णवाहिकांचा अभाव तसेच देखभाल दुरुस्ती व्यवस्थित होत नसल्याने रुग्णांना १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिका उपलब्धच होत नाहीत. अशावेळी गोरगरीब रुग्णांसह अशा गर्भवतींना हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.**

# एक महिन्यात ९२ हजार अर्ज

**। ठाणे । प्रतिनिधी ।**



सिडको महामंडळाच्या 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या महागृहनिर्माणयोजनेलानागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभत असून योजनेचा प्रारंभ केल्यापासून सुमारे एक महिन्याच्या कालावधीत ९२ हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. या गृहनिर्माण योजनेकरिता अधिकाधिक नागरिकांना अर्ज करता यावा याकरिता योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीसही ११ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.


सिडकोतर्फे ११ ऑक्टोबर रोजी 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत नवी मुंबईच्या वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाकरिता २६ हजार सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. अर्जदारांना आपल्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य हे या योजनेचे वैशिष्ट्य आहे. सिडकोच्या अन्य गृहनिर्माण योजनांप्रमाणेच या गृहनिर्माण योजनेसही नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभून आजपर्यंत ९२ हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत.

योजनेकरिता अधिकाधिक नागरिकांना अर्ज करता येऊन त्यांचे घराचे स्वप्न साकार व्हावे याकरिता योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस ११ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अर्ज नोंदणीस मुदतवाढ देण्यात आल्याने अर्जदारांना उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र इ. आवश्यक त्या कागदपत्रांची जमवाजमव करण्यासाठीही पुरेसा अवधी मिळणार आहे.

# प्राथमिक शैक्षणिक संकुलांची वाताहत

**। पालघर । प्रतिनिधी ।**
मोखाडा तालुक्यातील जि.प.च्या १५४ शाळांमधील ४८८ वर्ग खोल्या धोकादायक अवस्थेत आहेत. तर, शौचालयांची अवस्था अतिशय गंभीर आहे. त्याशिवाय संपूर्ण तालुक्याच्या शैक्षणिक व्यवस्थेचे कामकाज ज्या ठिकाणी चालते त्या गट संसाधन केंद्रासह २६ समूहसाधन केंद्रे ही दुरूस्तीसाठी निधीच नसल्याने अक्षरशः बेवारस अवस्थेत पडून आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांना प्राथमिकत: भौतिक सुविधा देणे विधीसंमत असतांनाही जिल्हा परिषद व शिक्षण विभाग त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप पालकांमधून केला जात आहे.

तालुक्यात शासनाने लाखो रुपयांचा निधी खर्च करून १३ केंद्रप्रमुखांसाठी समूहसाधन केंद्रे बांधलेली आहेत. मात्र, सुर्यमाळ येथील समूहसाधन केंद्राचा अपवाद वगळल्यास इतर १२ ठिकाणची समूहसाधन केंद्रे ही विनावापर पडून असल्याने या केंद्रांची अक्षरशः वाताहत झालेली आहे. ती जनावरे आणि मद्यपींची आश्रयस्थाने झालेली आहेत. या केंद्रांमधून केंद्रप्रमुखांनी आपल्या अखत्यारीतील शाळांचा कारभार पहाणे क्रमप्राप्त असतांनाही याठिकाणी ते हजेरी लावीत नसल्याने या केंद्रांची दुरवस्था झालेली आहे.



## वृद्ध महिलेला क्रेनने चिरडले

**। पालघर । प्रतिनिधी ।**
भाईंदर पूर्वेच्या सेवन इलेव्हन शाळेजवळील रस्ता ओलांडत असताना एका वृद्ध महिलेला क्रेनने चिरडल्याची घटना घडली आहे. क्रेनच्या पुढील चाकाच्या खाली येऊन या वृद्ध महिलेचा घटनास्थळी मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार अपघातात मृत झालेल्या महिला मुंबई महापालिकेतून मुख्य लिपिक म्हणून सेवानिवृत्त झाल्या होत्या. दरम्यान, सेवन इलेव्हन शाळेजवळ जात असताना, अचानक क्रेनने त्यांना रस्त्याच्या मध्यभागी धडक दिली. या धडकेत त्या महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे. या घटनेची माहिती मिळताच नवघर पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांनी क्रेन चालकाला ताब्यात घेतले असून पुढील तपास नवघर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धिरज कोळी हे करत आहेत.

## वाढत्या आत्महत्या चिंतेचा विषय

**। पालघर । प्रतिनिधी ।**
मीरा-भाईंदर शहराची लोकसंख्या गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढलेली असून त्यातच नागरी वस्तीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. गाव खेड्यातून तसेच परराज्यातून नागरिकांचे लोंढे शहराकडे येत आहेत. त्यानुसार वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता मीरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्यात आली होती. वाढत्या गुन्हेगारी सोबत शहरात आत्महत्येचे वाढलेले प्रमाण सुध्दा चिंतेचा विषय बनला आहे. तसेच, गेल्या २० महिन्यांत ६५१ आत्महत्या झाल्याने अपघाती मृत्यूची नोंद पोलिसांनी केली आहे. शहराची लोकसंख्या १५ लाखांपर्यंत पोहोचली आहे. गुन्हेगारीवर वचक बसविण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. परंतु, शहरातील वाढत्या आत्महत्या पोलिसांसाठी आणि शासनासाठी चिंतेचा विषय बनला आहे.

# धान खरेदीला भ्रष्टाचाराची कीड

**। ठाणे । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळातर्फे दरवर्षी आधारभूत किंमत योजनेअंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून भातासह भरड धान्य खरेदी केली जाते. मात्र, या खरेदीत गैरप्रकार झाल्याचे मागील तीन वर्षात उघडकीस आले आहे. असे असताना या भ्रष्टाचारात दरवर्षी वाढ होताना दिसत आहे. हा भ्रष्टाचार करण्यास सोसायट्यांचे संचालक यांसह आदिवासी विकास महामंडळाचे घरभेदी सामील असल्याचे वेळोवेळी निष्पन्न झाले असून हा भ्रष्टाचार रोखणार कोण, असा प्रश्न शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

आदिवासी विकास महामंडळ हे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाला योग्य मोबदला मिळावा, यासाठी 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर काम करीत आहे. खरेदी होणाऱ्या संपूर्ण शेतीमालाची, शेतकऱ्यांची नोंदणी एनइएम १ या पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करण्यात येते. मात्र, या योजना राबवितांना मागील काही वर्षांत पीक पेरा कमी असताना जादा पीक पेरा दाखविणे, बनावट ७/१२ उतारे निदर्शनास येणे, शेतकऱ्यांनी वेळेवर ई-पीक पाहणी न करणे, केवायसी नसल्याने चुकारे अदा करतांना येणाऱ्या अडचणी आदी गैरप्रकार समोर आले आहेत.

## निवृत्त पोलीस कर्मचाऱ्याची हत्या

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**
कणकवली तालुक्यातील कोळोशी येथे सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्याची हत्या झाली आहे. गुरुवारी (दि.२८) सकाळी हा प्रकार उघडकीस आला. विनोद आचरेकर (५६) असे त्यांचे नाव आहे. विनोद आचरेकर मुंबई पोलिस दलात कार्यरत होते. त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. गुरुवारी सकाळी त्यांचा मृतदेह आढळून आला. त्यांच्या डोक्यावर मोठ्या जखमा आढळल्या. दरम्यान, आचरेकर यांच्या मृत्यूची माहिती पोलीस पाटील संजय गोरुले यांनी कणकवली पोलिसांना दिली. त्यानंतर कणकवली पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि एका संशयिताला ताब्यात घेतले आहे.

# उपजिल्हा रुग्णालयात कर्मचाऱ्यांची कमतरता

**। पालघर । प्रतिनिधी ।**



जव्हार तालुक्यात आरोग्यसेवा हा मुद्दा नेहेमीच ऐरणीवर असतो. शहरातील १०० खाटांचे पतंग शाह उपजिल्हा रुग्णालयावर मोखाडा, विक्रमगड, वाडा हे तालुके तसेच डहाणू तालुक्यातील काही भाग अवलंबून आहे. शिवाय याच उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीक अधीक्षक डॉ. रामदास मराड यांची वर्णी पालघर येथील जिल्हा शल्य चिकित्सकपदी लागल्याने येथे पूर्ण वेळ वैद्यकीय अधीक्षकांसह २७ पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध डॉक्टर, कर्मचाऱ्यांवर रुग्ण सेवा देताना अतिरिक्त कामाचा ताण येऊन आरोग्य सेवेवरही परिणाम होत आहे.

तसेच या रुग्णालयात प्रसूति व स्रीरोग तज्ज्ञ, सर्जन, फिजीशियन, अस्थिरोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, सोनोग्राफी तज्ज्ञ तसेच भूलतज्ज्ञ आणि दंतरोग तज्ज्ञ ही पदे रिक्त असल्याने रुग्ण सेवा देताना मर्यादा येऊन रुग्णांना पुढील उपचारासाठी नाशिक, सेलवास, ठाणे येथे पाठविले जात आहेत. सध्या उपजिल्हा रुग्णालयाकडे १०७ मंजूर पदे आहेत. त्यातील २७ विविध पदे रिक्त आहेत.

## लोखंडी रॉडने बेदम मारहाण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
राजीवडा मच्छिमार्केट परिसरात एकाला हॉकी स्टिकने तसेच लोखंडी रॉडने चौघांनी बेदम मारहाण केली आहे. याप्रकरणी अमीर मुजावर (४०), मुजफ्फर मुजावर (३०), फैजान फणसोपकर (२३), जमीर मुजावर (३६) या चार जणांविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाणीची ही घटना बुधवारी (दि.२७) घडली आहे. या संशयितांनी अब्दुल इकबाल वस्ताला दुचाकीवरुन खाली ओढून हॉकी स्टिकने तसेच लोखंडी रॉडने पायांवर, डोक्यावर आणि पाठीवरती मारुन गंभीर जखमी केले.

# ईडीच्या आदेशाने कातभट्ट्यांवर छापा?

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



सावर्डे परिसरातील तीन कात भट्ट्यांवर नाशिक येथील वनविभागाने छापा टाकून एक गोदाम सील केले आहे. तर, तीनही ठिकाणची कागदपत्रे जप्त केली आहेत. या प्रकरणी गुजरात ईडी कार्यालयाने दिलेल्या आदेशानंतर ही धडक कारवाई केल्याची अधिकृत माहिती प्राप्त होत आहे. दरम्यान, मंगळवारी (दि.२६) करण्यात आलेल्या या कारवाईमुळे चिपळुणात एकच खळबळ उडाली आहे.

नाशिक येथे विनापरवाना खैरतोड करून येथील खैराचे लाकूड सावर्डेमध्ये आणल्याचा नाशिक वनविभागाचा संशय आहे. त्यानुसार मंगळवारी दिवसभर छापा टाकण्यात आला. दहिवली, सावर्डे परिसरातील तीन कात भट्ट्यांवर ही धडक कारवाई करण्यात आली. याठिकाणी मोठ्या प्रमाणात खैराचे लाकूड तसेच तयार केलेला ज्यूस आणि कात वनविभागाने जप्त केला आहे. याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन महिन्यांपूर्वीच या ठिकाणी दहशतवाद विरोधी पथकाने धाड टाकून खैरसाठा जप्त केला होता.

आता पुन्हा एकदा नाशिक वनविभागाने कारवाई केल्यानंतर कात उद्योजकांचे धाबे दणाणले आहेत. हा छापा गुजरात येथील ईडीच्या आदेशाने झाल्याचे नाशिक येथील वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे हे प्रकरण कोणते वळण घेणार याबाबत चर्चा सुरू आहे.

## निवृत्त तलाठ्याला २५ हजारांचा दंड

**। पालघर । प्रतिनिधी ।**
माहिती अधिकारात मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ केल्याप्रकरणी विरारच्या निवृत्त तलाठ्याला २५ हजारांचा दंड सुनावण्यात आला आहे. राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाने हा आदेश दिला. तक्रारदाराला पुढील १५ दिवसात निशुल्क माहिती पुरविण्याचे निर्देशही खंडपीठाने दिले आहेत.

टेरेन्स हॅन्ड्रीक्स हे माहिती अधिकार कार्यकर्ते आहेत. हॅन्ड्रीक्स यांनी १६ एप्रिल २०२१ रोजी विरारचे तत्कालीन तलाठी चंद्रकात साळवे यांच्याकडे फेरफार संदर्भात माहिती मागितली होती. मात्र, त्यांना माहिती देण्यात आली नाही. यामुळे हॅन्ड्रीक्स यांनी अपील दाखल केले तरी त्यांना कोणतीही माहिती देण्यात आली नाही. यामुळे हॅन्ड्रीक्स यांनी द्वितीय अपील दाखल केले. या अपिलावर राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाने नुकतीच सुनावणी घेतली.

### व्हर्टेक्स इमारत आगीनंतर त्रुटी उघड

# केडीएमसीकडे पुरेशी अग्निसुरक्षा नाही

**। कल्याण । प्रतिनिधी ।**
**कल्याण पश्चिमेतील व्हर्टेक्स इमारतीतील अलिकडील आगीच्या दुर्घटनेवरून आमदार भोईर यांनी केडीएमसी प्रशासनावर तीव्र टीका केली. आग आटोक्यात आणण्यासाठी आवश्यक उंच शिडीची गाडी बंद असल्याने त्याच्या उपयोगाअभावी ही दुर्घटना मोठी ठरू शकली असती. या विषयीची अधिकाऱ्यांनी सहा महिने फाईल रखडवून ठेवली, ही गंभीर दुर्लक्षाची बाब आहे, असे ते म्हणाले.**



आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांना याची जबाबदारी स्वीकारावी लागेल, असा आग्रह धरत भोईर यांनी सांगितले की, जर प्रशासन आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत नसेल, तर आम्ही त्यांना जबाबदार ठरविण्यासाठी कडक पावले उचलू असा इशाराही आमदार भोईर यांनी दिला आहे.

कल्याणमधील वरटेक्स या गगन चुंबी इमारतीच्या १५ व्या माळ्यावर मंगळवारी आग लागली होती. ही आग आटोक्यात आणायला कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाला यश आले. मात्र, ही आग आटोक्यात आणण्यासाठीची यंत्रणा ठाण्यावरून मागवावी लागली. केडीएमसीकडे पुरेशी यंत्रणा नसल्यामुळे कल्याण डोंबिवली महापालिकेवर टीका होत आहे. यामुळे येथील या गगनचुंबी इमारतीत राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षितेचा प्रश्न उपस्थित होत आहे.

कल्याण-डोंबिवली आणि टिटवाळा परिसरात गगनचुंबी इमारतींच्या वाढत्या संख्येसोबत अग्निशमन यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. नुकत्याच एका १६ मजल्यांवर लागलेल्या आगीत उच्चतम दाबाने पाणी मारा करणाऱ्या वाहनाच्या तांत्रिक बिघाडामुळे ठाणे महापालिका आणि बदलापूर नगरपालिकेच्या अत्याधुनिक अग्निशमन वाहनांची मदत घ्यावी लागली. या घटनेत जीवितहानी झाल्याची माहिती नाही, परंतु वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाली आहे.

## पाजपंढरी रस्त्यावर मोठे भगदाड

**रत्नागिरी** : दापोली तालुक्यातील पाजपंढरी मंदीराजवळील काँक्रिट रस्त्यावर मोठा खड्डा पडला असल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. तिथे अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे खड्डा लवकरात लवकर बुजवा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. स्थानिक ग्रामपंचायतीवर गेले पंचवीस वर्षांपेक्षा अधिक कालावधीत लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय कारभार पाहणाऱ्या प्रशासकाचा या महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष होत आहे. पाजपंढरी येथील रस्त्यावर सांडपाणी वाहून जाण्यासाठी पक्के सिमेंट काँक्रिटचे बांधकाम करण्यात आले आहे. त्या बांधकामावरील लोखंडी जाळी चेंबरमध्ये अडकून पडली आहे. चेंबरमध्ये पडलेली जाळी काढून ती पुन्हा व्यवस्थित बसवणे आवश्यक आहे.

# गुरांच्या गळ्यात रेडीयम बेल्ट

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



दररोज अनेक रस्ते अपघात होत असतात. त्यामधील बहुसंख्य अपघात हे रात्रीच्या अंधारात रस्त्यातील गुरे न दिसल्यामुळे झालेले आहेत. या घटनांमध्ये वाहनचालकांसह गुरेही जायबंदी होत असतात. हे प्रकार टाळण्यासाठी उनाड गुरांच्या गळ्यात रेडियम बेल्ट बांधण्याचा उपक्रम पाटपन्हाळे ग्रामपंचायतीने हाती घेतला आहे. आतापर्यंत १५ मोकाट गुरांच्या गळ्यात रेडियम बेल्ट बांधण्यात पाटपन्हाळे ग्रामपंचायतीला यश आले आहे. अजूनही मोकाट असलेल्या गुरांना रेडीयम बेल्ट बांधण्यात येणार असल्याचे सरपंच विजय तेलगडे, उपसरपंच असीम साल्हे यांनी सांगितले आहे.

श्रृंगारतळी बाजारपेठेसह ग्रामीण भागातही आजकाल मोकाट गुरांचा प्रश्न सतावत आहे. गुरांचे संगोपन करण्याऐवजी मालक त्यांना मोकाट सोडून देतात. त्यामुळे या मोकाट गुरांचे वास्तव्य बाजारपेठेत वाढलेले आहे. गुरांचे कळप रस्त्यावर ठाण मांडून बसतात. त्यामुळे अनेकदा वाहन अपघातांच्या घटना घडत आहेत. रस्त्यावर फिरणारी मोकाट गुरे वाहनचालकांना रात्रीच्या अंधारात न दिसल्यामुळे त्यांना धडक बसते. त्यातून गुरे हकनाक बळी पडतात. अनेकदा माणसांच्याही जीवाला धोका निर्माण होतो. हे टाळण्यासाठी पाटपन्हाळे ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच विजय तेलगडे, उपसरपंच असीम साल्हे, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच गावातील तरुणांच्या सहकार्यातून रेडियम बेल्ट बांधण्यात येत आहेत.

# विद्यार्थ्यांना 2 पेपरमध्ये अभ्यासासाठी वेळ

## दहावी-बारावीचे प्रात्यक्षिक फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात

**। रायगड । प्रतिनिधी ।**

इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दोन विषयांच्या पेपरमध्ये एक ते तीन दिवसांचे अंतर ठेवले आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ मिळावा, त्यांच्यावर जास्त ताण येणार नाही हा त्यामागील हेतू आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ११ फेब्रुवारी तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी रोजी सुरू होणार आहे.

जेईई, नीट परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळावा,



पुरवणी परीक्षा वेळेत घेऊन त्यात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी बोर्डाने यंदा प्रथमच दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा दहा दिवस अगोदर घेण्याचा निर्णय घेतला. विधानसभेची निवडणूक संपून, निकाल जाहीर होताच बोर्डाने परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

बारावीच्या विद्यार्थ्यांचे भाषा विषयांचे पेपर सलग होतील, पण त्यानंतरच्या विषयांचे पेपर एक ते तीन दिवसांच्या अंतराने होतील. तर दहावीच्या विद्यार्थ्यांचा पहिला पेपर झाल्यावर त्यांना दुसऱ्या विषयाच्या पेपरसाठी सात दिवसांचा अवधी मिळणार आहेत. या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक तथा तोंडी परीक्षा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सुरू होईल. दरवर्षी जानेवारीत होणारी सराव परीक्षा आता डिसेंबरमध्ये घेण्याची तयारी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी सुरू केली आहे. कॉपीमुक्त परीक्षेसाठी यंदा सर्व केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे, विद्यार्थ्यांच्या हॉलमध्ये देखील कॅमेरे असणार आहेत. त्यामुळे परीक्षा केंद्रांवरील गैरप्रकाराला आळा बसेल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या https://mahahsscboard.in/mr या संकेतस्थळावर इयत्ता दहावी व बारावीच्या सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना सविस्तर वेळापत्रक पाहता येणार आहे.

### इयत्ता बारावी

- ११ फेब्रुवारी : इंग्रजी
- १२ फेब्रुवारी : हिंदी
- १३ फेब्रुवारी : मराठी
- १७ फेब्रुवारी : फिजिक्स
- २० फेब्रुवारी : रसायनशास्त्र
- २२ फेब्रुवारी : मॅथेमॅटिक्स
- २५ फेब्रुवारी : सहकार
- २७ फेब्रुवारी : जीवशास्त्र
- १ मार्च : भूशास्त्र, अर्थशास्त्र
- ७ मार्च : भूगोल
- ८ मार्च : इतिहास
- ११ मार्च : समाजशास्त्र

### इयत्ता दहावी

- २१ फेब्रुवारी : मराठी
- १ मार्च : इंग्रजी
- ३ मार्च : हिंदी
- ५ मार्च : गणित भाग-१ (बीजगणित)
- ७ मार्च : गणित भाग-२ (भूमिती)
- १० मार्च : विज्ञान तंत्रज्ञान भाग-१
- १२ मार्च : विज्ञान तंत्रज्ञान भाग-२
- १५ मार्च : समाजशास्त्र भाग-१ (इतिहास व राज्यशास्त्र)
- १७ मार्च : समाजशास्त्र भाग-२ (भूगोल).

# महानगरपालिकेच्यावतीने बालविवाहमुक्त प्रतिज्ञा

**। पनवेल । वार्ताहर ।**

देशामध्ये बालविवाहाचे प्रमाण कमी होण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेच्यावतीने बालविवाहमुक्त भारतप्रतिज्ञा घेण्यात आली.

यावेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकीय



अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बालविवाहाचे दुष्परिणाम, बालकांचे हक्क आणि आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याविषयी प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे आजपासून केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्यावतीने बालविवाह मुक्त भारत या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला असून, या पार्श्वभूमीवर मा. सह सचिव महिला व बाल विकास विभाग भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या व्हीसीनुसार बाल विवाह मुक्त भारत प्रतिज्ञा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, त्यानुसार ही प्रतिज्ञा घेण्यात आली.

# कुंभारवाडा स्मशानभूमीचा रस्ता उजळला

## दिनेश रातवडकरांच्या प्रयत्नांनी विजेचा लखलखाट



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्र.१७ मधील जुने माणगाव कुंभारवाडा येथील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावर वॉर्डाचे नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या प्रयत्नांनी विजेचा लखलखाट झाला आहे.

नगरसेवक दिनेश रातवडकर हे माणगाव नगरपंचायतीच्या सन २०२१-२२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत वॉर्ड क्र.१७ मधून दणदणीत मतांनी निवडून आल्यावर लोकप्रतिनिधी कसा असावा याचे उत्तम उदाहरण देत त्यांनी काही दिवसातच आपल्या वॉर्डात विकास कामांचा धडाका सुरु केला. त्यामध्ये प्रामुख्याने वॉर्डातील रस्ते, स्मशानभूमीची कामे, ग्रामस्वच्छता, वॉर्डातील विविध भागातील पाणवठे, मस्जिद मोहल्ला येथे सामाजिक सभागृह, संगमेश्वर मंदिराचे सुशोभिकरण असे अनेक विकासाची कामे करून आपल्या वॉर्डातील मतदारांचा विश्वास सार्थ ठरवून दाखविला. वॉर्डातील कुंभारवाडा येथील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावर गेली अनेक वर्ष पथदिवे नव्हते. त्यामुळे या रस्त्यावरून अंत्यविधीला जात असताना येथील ग्रामस्थांना रस्त्यावर विजेची सोय नसल्याने येथील ग्रामस्थांना हि समस्या वारंवार जाणवत होती.

# एनर्जी ड्रिंक्सचे अतिसेवन आरोग्यास घातक

**। उरण । वार्ताहर ।**

शाळा, महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींमध्ये एनर्जी ड्रिंक्सच्या सेवनाचे प्रमाण अलीकडे वाढले आहे. शाळा-महाविद्यालय परिसरातील टपरी, किराणा दुकानात सहजरित्या हे एनर्जी ड्रिंक्स मिळत असल्याने मुलांमध्ये या ड्रिंक्सच्या सेवनाचे प्रमाण जास्त आहे.

बाजारात सहज उपलब्ध असणाऱ्या एनर्जी ड्रिंक्सचे अतिसेवन आरोग्यासाठी घातक असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत आहे. शाळा, परिसरात काही एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीला बंदी असतानाही विद्यार्थ्यांना ते सहज मिळत असते. याबाबत कारवाई व्हायला हवी, अशी मागणी, शिक्षक, पालकांसह जाणकारांमधून होत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये एनर्जी ड्रिंक्सबाबत जागृती करण्याची गरज आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये एनर्जी ड्रिंक घेण्याचे प्रमाण गत दोन वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. एनर्जी ड्रिंकमध्ये केमिकलचे प्रमाण अधिक असल्यामुळे त्याचा मुलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे.

कॅफेनच्या जादाच्या मात्रेमुळे हायपरटेन्शन, कॅल्शियमची कमतरता निर्माण होणे, मानसिक आरोग्य खराब होणे, हृदय व रक्त वाहिन्यांवर विपरित परिणाम होणे आदी समस्यांनाही सामोरे जाण्याची भीती असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. ग्रामीणसह शहरी भागातील मुले व युवकांमध्ये एनर्जी ड्रिंक घेण्याची क्रेझ वाढली आहे.

आजारांचा धोका एनर्जी ड्रिंकमध्ये विविध प्रकारची रसायने असल्याने हृदयासंबंधी आजार बळावण्याची भीती असल्याचे डॉक्टर सांगतात. शाळकरी मुलांनी एनर्जी ड्रिंकऐवजी फळे व पौष्टिक आहार घेतल्यास त्याचा शारीरिक वाढीसाठी ते अधिक चांगले असते, असे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.

# ज्येष्ठांची मोफत आरोग्य तपासणी

**पनवेल :** नेरे येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी शांतीवन या संस्थेमध्ये इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे अध्यक्षा डॉ. वीणा मनोहर यांच्या नियोजनातून मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर पार पडले. या शिबिराचा ८० ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला. या शिबिरात शांतीवन येथील आधारगृह वृद्धाश्रम आणि कुष्ठरुग्ण यांच्या विविध तपासण्या करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. त्याचबरोबरीने त्यांना आरोग्याच्या दृष्टिकोनातून मोफत वैद्यकीय सल्ला व औषधेही देण्यात आली.

# गोखले महाविद्यालयात संविधान दिन

**श्रीवर्धन :** येथील गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या व मुंबई विद्यापीठाच्या निर्देशाप्रमाणे २६/११ च्या मुंबई बॉम्बस्फोटात हुतात्मा झालेल्या शहिदांना आदरांजली वाहण्यात आली. या देशभक्तीचा गौरव आणि स्मृतींना उजाळा देऊन विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती व एकात्मतेची आणि राष्ट्रनिष्ठेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ जानेवारी १९५० रोजी देशाला स्वातंत्र्य-समता-बंधुता व समानता मिळवून देण्यासाठी व भारतीय लोकशाही सशक्त होण्यासाठी याच दिवशी 'संविधान' अर्पण केले. या 'संविधान अमृत महोत्सवानिमित्त' तरुण विद्यार्थ्यांच्या मनात भारतीय संविधानाबद्दल जनजागृती निर्माण व्हावी व संविधान हा लोकशाहीचा सशक्त आधारस्तंभ आहे. ही भावना रुजवण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, प्रा. किशोर लहारे व प्रा. नवज्योत जावळेकर यांनी सामूहिकरित्या 'संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन' करुन उपस्थितांना शपथ दिली. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# खारघर: अनधिकृत आठवडी बाजार

**पनवेल :** खारघरमधील 'सिडको'ने कॉर्पोरेट पार्ककरिता आरक्षित केलेल्या भूखंडावर आठवडी बाजार भरविला जात आहे. मात्र, या अनधिकृत आठवडी बाजारकडे सिडको अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. खारघर परिसरात सेक्टर निहाय दादा मंडळींच्या सहकार्याने मैदान, रस्त्यावर आणि बस थांब्यासमोर आठवडी बाजार भरविला जात असूनही पनवेल महापालिका अधिकाऱ्यांकडून डोळेझाक केले जात असल्यामुळे नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून ओवे गावालगत 'सिडको'ने कॉर्पोरेट पार्कसाठी राखीव ठेवलेल्या भूखंडावर अतिक्रमण होऊ नये यासाठी तार कुंपण केले आहे. मात्र, भूखंड भोवतालचे तार कुंपण काढून या भूखंडावर आठवडी बाजार भरविला जात असल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. तसेच कॉर्पोरेट पार्कसाठी राखीव भूखंडावर काही नागरिकांना ढाबा, रेती, खडी, भंगार दुकाने तर काही नागरिकांनी वाहने धुण्याची दुकाने थाटली आहेत. सिडकोच्या भूखंडावर अतिक्रमण करुन त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करुनही त्याकडे सिडको अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. सदर भूखंड सिडकोचा असल्यामुळे पनवेल महापालिकेचे अधिकारी कॉर्पोरेट पार्कसाठी राखीव ठेवलेल्या भूखंडावरील अतिक्रमणाकडे डोळेझाक करीत आहेत. त्यामुळे कॉर्पोरेट पार्कसाठी राखीव ठेवलेल्या भूखंडावरील अतिक्रमणावर वरिष्ठ सिडको अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून केली जात आहे.

**सिडकोचे दुर्लक्ष, नागरिकांमध्ये नाराजी**

# जिल्हा सहकार भारतीच्या अध्यक्षपदी प्रा. मेघराज जाधव



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा सहकार भारतीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्षपदी प्रा. मेघराज जाधव (मुरुड) यांची नियुक्ती करण्यात आली असून, जिल्हा महामंत्रीपदी संतोष पोकळे तसेच संघटन सहप्रमुखपदी प्रताप मांडवकर, तर जिल्हा कार्यकारिणी सदस्य म्हणून रवींद्र कदम यांची निवड करण्यात आली आहे.

सहकार भारती कोकण विभागातर्फे आयोजित बैठकीत रायगडसह पालघर, ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग आदी महानगरांची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश सहसंघटन प्रमुख प्रवीण बुलाख, ज्येष्ठ कार्यकर्ते विष्णू बोबडे, राजू ठाणगे, कृष्णकांत निमसे, प्रा. वीणा मोकाशी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रदेश सह संघटन प्रमुख प्रवीण बुलाख यांनी आगामी काळातील कार्यक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णकांत निमसे व वीणा मोकाशी यांनी केले.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- सन स्टोन रीयल इस्टेट, साईना कॉम्प्लेक्स, चर्चच्यासमोर(ऑफीस, अलिबाग व आजुबाजुच्या गावामध्ये N.A.Plat बागायती प्लॉट भातशेती खरेदी व विक्री. संपर्क :८६६९००६९०२/९२७०८८८८०३
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. हाऊस कीपर, नाईट शिफ्ट हाऊस कीपर, वेटर ० ते २ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- महाराष्ट्रातील कोकणस्त प्रथम वधूवरांना तसेच घटस्फोटित, विधवा, विधूर, यांना आपला मनपसंत जोडीदार निवडण्यासाठी एकच नाव लग्न सोहळा मुंबई ९७०२५२७३७३
- अलिबाग येथील नामांकित आर्किटेक्ट ऑफिस करीता खालील पदे भरावयाची आहेत. 1] Receptionist 2] Civil Draftsman [Auto cad drafting ची माहिती असलेला) 3] Civil Engineer संपर्क -: मो नं ९७६७७४४६५८, ९८२२५८५५००
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये ऑफीस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे.१०/१२ वी, संपर्क : ९२७०५६०४५६
- घरकामासाठी बाई पाहिजे, कामाचे स्वरुप जेवण बनवणे, कपडे, भांडी, साफसफाई इ. वेळ व पगार ठरवण्यात येईल. पत्ता : रायगड बाजारजवळ, फोन : ७९७७०२७८१४
- अलिबागमध्ये नामांकित टू व्हीलर शोरुमध्ये अनुभवी मॅकेनिक पाहिजे व शोरुममध्ये काम करायला बाई पाहिजे. (संपर्क :७५१७७०१८५८ /९८२२०६३१६६)
- पाहिजेत : वॉटर पंप मॅकेनिक (पाण्याचे पंप कारागीर), फिटर, हेल्पर (बाहेर गावच्या व्यक्तींसाठी राहण्याची सोय) त्वरीत भेटा. मे. हजारे एन्टरप्रायजेस, अलिबाग. संपर्क : ९८२२००१८५३
- अलिबागमधील नामांकित ऑफिसकरीता क्लार्क / टायपिस्ट तसेच शिपाई / ऑफिस असिस्टंट पाहिजेत. jobsinmarketing01@gmail.com या ईमेलवर बायोडाटा पाठविणे. संपर्क - ९७३०३२६३०४
- अलिबागमध्ये मध्यवर्ती ठिकाणी ३५० स्क्वेअर फुट कमर्शियल जागा भाड्याने देणे आहे. संपर्क ९३७१७७१७३१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# विजेच्या लपंडावाने नागरिक हैराण

## अखंडित वीज सेवा पुरविण्याची जनतेची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

अन्न, वस्त्र, निवारा याचबरोबर वीजसुद्धा आता अत्यावश्यक सेवा बनली आहे. आज कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण हे विजेशिवाय चालूच शकत नाहीत. टीव्ही, मोबाईल, फॅन, कुलर, एसी, फ्रीज, इलेक्ट्रॉनिक वाहने आणि उपकरणे विजेशिवाय चालूच शकत नाही. विजेचा वापर आता सर्वत्र मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

दिवसेंदिवस विजेची मागणी वाढतच चालली आहे. मात्र उरण मध्ये या अत्यावश्यक सेवेचा तीनतेरा वाजले आहेत. गेले चार ते पाच दिवस दररोज पहाटे उरण शहरात वीज बंद होत आहे. पहाटे पहाटे वीजपुरवठा बंद होत असल्यामुळे उरण शहरातील नागरिक हैराण झाले आहेत.

दररोज वीज जात असल्याने घरातील टीव्ही, फ्रीज, ऐसी, कुलर




आदी उपकरणे बंद पडत आहेत. याचा आर्थिक फटका विनाकारण ग्राहकांना बसत आहे. पहाटे कधी ४ वाजता तर कधी पहाटे ५ वाजता वीज जात असल्याने नागरिकांची झोपमोड होत आहे. त्याचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. ग्राहकांना वीज बिले वेळेत दिली जातात.

पैसे नाही भरले तर मीटर कापून नेले जाते. वीजपुरवठा बंद केला जातो. मात्र, ग्राहकांनी वेळेत वीज बिल भरूनसुद्धा ग्राहकांना महावितरणतर्फे विजेची चांगली सुविधा मिळत नसल्याने उरणमधील जनता महावितरणच्या कारभारावर प्रचंड प्रमाणात नाराज आहेत.

> **दररोज पहाटे उरण शहरात वीज घालवली जाते. त्याचा नाहक त्रास जनतेला होत आहे. त्यामुळे त्याचा परिणाम मानवी शरीरावर होत आहे. महावितरणतर्फे नियमितपणे, अखंडित वीजपुरवठा झाली पाहिजे.**
> **- शुभम उरणकर, नागरिक, उरण**

> **सबस्टेशनचा रिलेचा प्रॉब्लेम झाल्याने पहाटे वीज जात होती. काही तांत्रिक कारणेसुद्धा होती. आता कामे पूर्ण झाली असून, जनतेला कोणताही त्रास होणार नाही. कुठे बिघाड झाल्यास त्वरित कामे केली जात आहेत.**
> **- संदीप चाटे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उरण महावितरण**

# ४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

## शहर टास्क फोर्सची मुख्यालयात बैठक

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात ४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये १ ते १९ वर्ष वयोगटातील सर्व मुलां-मुलींना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. महापालिका क्षेत्रातील सर्व लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी ही मोहीम योग्य पद्धतीने यशस्वीपणे राबविण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात ४ डिसेंबररोजीराष्ट्रीयजंतनाशकमोहीम राबविण्यासाठी दि. २५ नोव्हेंबर रोजी महापालिका मुख्यालयात शहर टास्क फोर्सची बैठक घेण्यात आली. यावेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयाचे जनवैद्यक औषधशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रसाद वायंगणकर, वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, माताबाल संगोपन अधिकारी गणेश नायर, सर्व वैद्यकीय अधिकारी, एएनम, जीएनएम ,एकात्मिक बाल विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या शाळा, गृहनिर्माण सोसायट्या, लोकसंख्या, महाविद्यालये अशी सर्व प्राथमिक माहिती एकत्रित करण्याविषयीच्या सूचना दिल्या. आरोग्य विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत अंगणवाड्यांमधील मुले, सर्व शासकीय शाळेचे विद्यार्थी, शासकीय अनुदानित-विनाअनुदानित शाळेचे विद्यार्थी, महापालिका शाळेतील विद्यार्थी, सर्व कनिष्ठ विद्यालये ,वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी या सर्वांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

### काय आहे जंतदोष?

खानपानाद्वारे विविध प्रकारचे जंतू लहान मुलांच्या पोटात जातात. या जंतूमुळे अन्नतील पौष्टीक सत्व मुलांच्या शरीराला मिळत नाहीत. त्यामुळे मुलांचा शारिरीक विकासही खुंटतो. तसेच विष्ठेद्वारे जंत बाहेर पडू लागतात. त्यामुळे मूल आजारी पडते. यासाठी राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा केला जातो. यादिवशी मुलांना जंतनाशक गोळ्या दिल्या जातात.

## तुळशीच्या लग्नानंतर विवाह सोहळ्यांची धूम

# शेतकरी नवरा नको गं बाई!

## कारभारीण मिळणे झाले कठीण

**। उरण । वार्ताहर ।**

कार्तिक पौर्णिमेला तुळशी विवाह आटोपताच लग्नसोहळे सुरू झाले. उपवर मुला-मुलींसह स्थळ शोधण्याच्या कार्यक्रमाला वेग आला आहे; परंतु या सर्व भानगडीत शेतकऱ्यांची मुले मात्र कायमच उपेक्षित असल्याचे चित्र यंदाही पाहावयास मिळण्याची शक्यता आहे. नोकरी करणाऱ्यांना, व्यावसायिकांना प्राधान्य दिले जात असल्याने यंदाही शेतकऱ्यांना कारभारीण मिळणे कठीण जाणार आहे.

अलीकडे जोडीदार निवडताना शिकलेल्या मुली, त्यांचे पालक आपल्या मुलींसाठी शिकलेला सरकारी नोकरी घरी थोडीफार शेती



असलेल्या मुलांनाच पसंती देत आहेत. खासगी नोकरी आणि सध्या कमी पगार असला तरी चालेल; पण तो शहरात राहणारा असावा, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

जुन्या काळामध्ये उत्तम शेती, मध्यम व्यापार, तर कनिष्ठ नोकरी समजली जायची. आता मात्र उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि शेतीला कनिष्ठ दर्जा दिला जात आहे. अलीकडे मुलींच्या अपेक्षा वाढल्या आहेत. उच्चशिक्षित, निर्व्यसनी, घरंदाज, कमविता वर मिळावा, अशी त्यांची इच्छा असते. यामुळे शेतकरी, शेतमजूर वरांची कुचंबणा होत असल्याचे चित्र आहे. यामुळे मुलांनी कोणत्याही परिस्थितीत शिक्षण-नोकरी-व्यवसायात स्वतःला सिद्ध करताना घाम गाळावा लागत आहे.

गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असलेले उपवर तरुण व त्यांचे कुटुंबीय 'यंदा कर्तव्य आहे' म्हणून एखादी मुलगी पाहा हो असा सूर आळवत आहेत. वधू-वर संशोधन केंद्रातही आता 'वधू पाहिजे'साठी नवरदेवांची नोंदणी वाढली आहे. त्यातच आता वराकडील मंडळी दोन्ही बाजूंचा खर्च करण्याची तयारी दर्शवीत आहेत.

राजकीय उदासीनतेचा शेतकऱ्यांना फटका पूर्वी शेतीला प्रतिष्ठा होती; परंतु आता शेती व्यवसायाला उतरती कळा लागली आहे. शेतकऱ्याच्या मुलीने आपल्या वडिलांचे काबाडकष्ट व शेतीची वाताहत डोळ्यांनी बघितलेली असते. त्यामुळेच मुलींनाच शेतकरी नवरा नको आहे. ही सामाजिक समस्या निर्माण होण्यास राजकीय उदासीनता दुर्लक्ष तेवढेच कारणीभूत आहे.

आजही मुलांपेक्षा मुलींच्या जन्मदाराचे प्रमाण कमी आहे. त्यातच ग्रामीण भागात मुलांपेक्षा मुलींचा शिक्षणाकडे अधिक कल आहे. मुलांपेक्षा मुली उच्चशिक्षित आहेत. त्यामुळे कमी शिकलेला मुलगा त्यांच्या पसंतीस उतरत नाही. परिणामी, उपवर-वधूसाठी नवरदेवाकडील मंडळींना वधूसंशोधन करावे लागत आहे. पूर्वी वरपित्याच्या घराचे उंबरठे झिजवावे लागत असे. आता उलट चित्र निर्माण झाले आहे.

# ईव्हीएम मशीन बंद करा

**पनवेल :** विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या याची मतमोजणी २३ रोजी पूर्ण झाली. यावेळी अनेक ठिकाणी ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड पहावयास मिळाले. तसेच ईव्हीएम मशीनच्या बॅटऱ्या ९९ टक्के चार्जिंग आढळून आल्या. त्यामुळे आमच्या मनात संशय येत असून, ईव्हीएम मशीनप्रमाणे मतदान घेणे म्हणजे लोकशाहीची हत्या असल्याचे सांगत पनवेलमधील गावठाण विस्तार हक्क समितीने पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांना निवेदन देत ईव्हीएम मशीन बंद करण्याची मागणी केली. राज्यभरात अनेक मतदारसंघात ईव्हीएममधील मतदान आणि प्रत्यक्ष झालेल्या मतदानात तफावत दाखवली जात आहे. त्यात पनवेलचादेखील समावेश असल्याने ईव्हीएम शंका उपस्थित होत आहे.

# महिलेच्या गळ्यातील सोन्याची माळ चोरली

**। नवीन पनवेल । वार्ताहर।**

७१ वर्षीय महिलेला बाकड्यावर बसवून बोलण्यात गुंतवले आणि सोन्याच्या बांगड्या आणि सोन्याची गळ्यातील माळ काढून नेल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

नंदा पारकर या नवीन पनवेल, सेक्टर ९ येथे राहत असून २६ नोव्हेंबर रोजी त्यांच्या मुलीने भाजी आणण्यासाठी सांगितल्याने त्या भाजी आणण्यासाठी बाजारात गेल्या. महादेव मंदिराकडे जात असताना एक अनोळखी ईसम दवाखान्याजवळ उभा होता. त्याने बंगालचे शेठ यांना मुलगा झाल्याने गरिबांना बाराशे रुपये आणि कपडे वाटप करत असल्याचे सांगितले व त्यांना बाराशे रुपये आणि कपडे दिले असल्याचे सांगून पारकर यांना दुर्गा माता मंदिरासमोरील बाकड्यावर बसायला सांगितले. यावेळी तुम्हाला देखील बाराशे रुपये आणि कपडे भेटतील तुम्ही गरीब दिसण्यासाठी हातातील बांगड्या व सोन्याची माळ काढून पिशवीत ठेवा असे सांगितले. यावेळी पारकर यांनी बांगड्या आणि माळ काढून छोट्या लाल रंगाच्या पिशवीत ठेवली. त्यानंतर तो इसम मार्केटच्या दिशेने निघून गेला. काही वेळाने दुसरा अनोळखी ईसम त्या ठिकाणी आला आणि बोलण्यात गुंतवून पांढऱ्या पिशवीतील सोन्याची पिशवी नीट बांधून ठेवतो असे सांगून ती पिशवी घट्ट बांधून पांढऱ्या पिशवीत ठेवली व त्यानंतर तो निघून गेला. पारकर यांनी काही वेळाने पिशवी पाहिली असता सोने ठेवलेली लाल रंगाचे पिशवी सापडून आली नाही. दोन्ही इसमानी त्यांना बोलण्यात गुंतवून दागिने चोरून नेले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मनोज मुरलीधर राऊत यांचेकडून खरेदी घेणेचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील :-**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ७६/१ | ०-१७-०० | ३.९० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- २९/११/२०२४

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
''अन्नपुर्णा'', मु.पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे ताडगाव, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकती.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं./ प्लॉट नं. | क्षेत्र हे.आर. /आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| विजय कृष्णाजी सावंत संचालक वैशाली हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड | ३०/१/प्लॉट/७५३ | ५-१७-०० | ५१-७० |
| | २८/१/प्लॉट/६६२ | १९-९२-०० | १९९-२० |
| | २९/प्लॉट/६८३ | ४९-९१-०० | ४९९-१० |
| | ३१/प्लॉट/७९६ | ४१-६५-०० | ४१६-५० |

**मौजे ताडगाव, ग्रामपंचायत ताडगाव, ता. सुधागड, जि. रायगड.येथील हॉटेल मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| मिळकत नं. | मिळकत वर्णन | क्षेत्र चौ.मी. | घरपट्टी | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| १२८ | आर सी सी पद्धतीचे घर हॉटेल पहिला मजला | १०६२.७२ | ३२१६२ | ६०९६६ |
| | आर सी सी पद्धतीचे घर हॉटेल दुसरा मजला | १०६२.७२ | २८८०४ | |

तरी वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क हितसंबध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे

दिनांक :- २८/११/२०२४

खरेदीदारांचे लेखक,
राठोड एण्ड एसोसिएट्स
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड

## शुद्धीपत्रक

दि.२८/११/२०२४ रोजी पान क्र.२ वर ॲड रिया गणेश पाटील यांची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाली होती त्या नोटीसीत ॲड.रिया गणेश पाटील यांचे नाव नजरचुकीने ॲड.रिचा गणेश पाटील असे छापण्यात आले आहे. तरी ते तसे न वाचता ॲड.रिया गणेश पाटील असे वाचण्यात यावे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली फ्लॅट मिळकत तिचे मालक सौ. मानसी आनंद कांबळे, रा. सदनिका नं. बी २०१, पॅराडाईज सीएचएस सी ग्रीट कॉलनी, जीएम लिंक रोड, शंकरा कॉलनी जवळ, गोथंडी पश्चिम, मुंबई- ४०००४३ यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

सदनिका नं. ३०४, तिसरा मजला, श्री साई साफल्य सर्व्हे गट नं. २बी (जुना सर्व्हे /गट नं. २/१बी) प्लॉट नं. ३, मौजे मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड क्षेत्र ३६७ चौ. फुट कारपेट एरीया या मिळकतीचे.

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तकारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २९/११/२०२४

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं. ४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत त्याचे मालक १. कीर्ती गोविंदभाई वाघाणी २ रश्मी रवींद्र पाटील यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - कलोते मोकाशी, तालुका - खालापूर, जिल्हा - रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| अनु. क्र. | मालकाचे नाव | सर्वे नंबर/गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | १. कीर्ती गोविंदभाई वाघाणी २. रश्मी रवींद्र पाटील | ३०९ | जिरायत ०.३०.०० पोटखराब ०.०४.०० एकूण ०.३४.०० | ०.३१ |
| २ | १. कीर्ती गोविंदभाई वाघाणी २. रश्मी रवींद्र पाटील | ३११/३ | जिरायत ०.४०.०० पोटखराब ०.०९.०० एकूण ०.४९.०० | ०.४७ |
| ३ | १. कीर्ती गोविंदभाई वाघाणी २. रश्मी रवींद्र पाटील | ३११/४ | जिरायत ०.२९.०० पोटखराब ०.०२.०० एकूण ०.३१.८० | १.५३ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक २८ नोव्हेंबर २०२४

**(सुमित साहेबराव साबळे)**
ॲडव्होकेट
कार्यालय शॉप ३, तळ मजला, सी विला अपार्टमेंट
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मोबाईल क्र. ८१४९२३६७६५

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)

**महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड**

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, ३ रा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग,
बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. : ०२२-६९०४१७७७, फॅक्स क्र. : ०२२-६९०४१७४०
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email : ceommb@ maharashtra.gov.in / ceommb@gmail.com

**द्वितीय ई-निविदा सूचना (सन २०२४-२५)/५६**

Main Portal : https://mahatenders.gov.in

मुख्य कार्यकारी, अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई यांचे मार्फत योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी बी-२ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | कोऱ्या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १. | काशीद ता.मुरुड, जि. रायगड येथे रो-रो सेवेकरीता तरंगती जेट्टी व तत्सम सुविधा निर्माण करणे. | ४२,००,००,०००/- | २१,००,०००/- | ३,५४०/- | २४ महिने (पावसाळा कालावधी धरुन) |

तपशीलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २९-११-२०२४ रोजी १५.०० वा. ते दिनांक २३.१२.२०२४ रोजी १७.०० वा पर्यंत उपलब्ध असतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

सही/-
**(सुधीर देवरे)**
**कार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वाळवटी, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत जमिनीच्या विद्यमान मालक श्री. दानिश सय्यद अली हद्दादी यांची जमिन मिळकत कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भोगवटा धारक | गट क्र. व भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे वाळवटी, ता. मुरूड, जि. रायगड | श्री.दानिश सय्यद अली हद्दादी | १२१/२ | ०-३८-०० | ०.५३ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत हि श्री. दानिश सय्यद अली हद्दादी यांची मिळकत कायम खरेदी विक्री करण्याबाबतचा सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक श्री. दानिश सय्यद अली हद्दादी यांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक : २८/११/२०२४

सही
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं.९२७२६२०००५

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना सदर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे भादाणे, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील ०-२०-४० हे. आर क्षेत्र मिळकतीचे विद्यमान मालक १.सौ. प्राजक्ती हेमंत मढवी रा. वसुंधरा, प्रभातनगर, निलिमा हॉटेल मार्ग, चेंढरे, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड २. श्री. राजेंद्र जनार्दन तुरे रा.घर क्र. ६७३, अथर्व निवास, वावे, पो. मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड ३. सौ. शुभांगी संतोष भगत, रा. ए-३, ग्लोबल हौसिंग सोसायटी, बिग स्लॅश हॉटेलसमोर, चेंढरे, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४. श्री. जयवंत एकनाथ मयेकर, रा. शिवनगर, गोंधळपाडा, वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड ५. सौ. सुनिता दिलीप म्हात्रे रा. सुदिप बंगलो, कर्णिक हॉलजवळ, पंतनगर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| भादाणे, ता.अलिबाग, जि. रायगड | ११४ | ०-५६-५० पैकी ०-२०-४० | ११-८० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २९.११.२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## अलिबाग नगरपरिषद
### सार्वजनिक सुचना

अलिबाग नगरपरिषद कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना याद्वारे सुचीत करण्यांत येते की, मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र.७१/२०१३ व अवमान याचिका क्र. ०६/२०१९ या अन्वये दिलेल्या निर्देशानुसार अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मुख्य रस्ते व इतर रस्ते या वरील मॅनहोल्सवर रस्ते खोदाई बाबतच्या तक्रारी https://mahaulb.in या संकेत स्थळावरील नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई यांचे मार्फत विकसीत करण्यात आलेल्या integrated web Based Portal (IWBP) प्रणालीवरील तक्रार मॉड्युलचा वापर करुन अलिबाग नगरपरिषदेकडे तक्रार दाखल करता येईल.

रस्त्यावरील खड्डे, मॅनहोल्स व रस्ते खोदाई बाबतची माहिती कळविण्याचा पत्ता व संपर्क नोडल अधिकारी श्री. संतोष मुंढे, नगर अभियंता अलिबाग नगरपरिषद. भ्रमणध्वनी क्र. ९३०९८०३३०६.

सही/-
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद.**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वडवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन तिच्या विद्यमान मालक श्री. राकेश दलिचंद जैन यांजकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| भूमापन क्र. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| ११५/अ/१/२ | ०-२१-१० पो. ख. ०-००-९० एकूण क्षेत्र ०-२२-०० | ०.४७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लीज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत लेखी पुराव्यांसह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९/११/२०२४

सही/-
**ॲड. ऋषिकेश रमेश माळी**
मु. ब्राम्हण आळी, लालबाग,
अलिबाग, पो. ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ७०८३८८१०००, ९०४९१६५१६४

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील भातशेती मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| विलास बाळु भोईर<br>लता बाळु भोईर<br>अनिल बाळु भोईर<br>ललिता बाळु भोईर<br>बारकीबाई शरद भोईर<br>निता अरुण शेळके<br>निशा शरद भोईर<br>निकिता शरद भोईर<br>हेमंत माया पाटील<br>रुपेश माया पाटील<br>प्रशांत माया पाटील | २५ | १/ब | ०-७२-७० पैकी ०-५४-७० | ५.५० |


तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २९/११/२०२४

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को. ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/८८८८०९८०८८


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


दिनांक : २९ नोव्हेंबर २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| जगन्नाथ गोविंद म्हसे | ६९ | ५ | १-७२-०० | १ | २५ |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :-२९/११/२०२४
मो.नं.९१५८२७७७२८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मांडला, ता. मुरूड, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्री. हिदायतुल्ला इसामुद्दीन दळवी, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मांडला ता. मुरूड | ५७ | वरकस ० ५८-०० पो.ख. ०-१६-०० एकुण ०-७४-०० | ०.८० |

वर नमुद जमिन मिळकतीचे एकुण क्षेत्रापैकी ०-२१-०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २८/११/२०२४
मोबा. ९९२२७९८५२८

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. चिंचपा गल्ली, नागाव
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. काशिद, ता. मुरूड, जि. रायगड येथील भूमापन क्र. १२/२/ड, एकूण ०-१९-१० हे. आर, आकार ४.६० रू. पै. या मिळकत क्षेत्रापैकी श्री. दत्ताराम सखाराम बेलोसे यांच्या हिश्याची मिळकत एकूण क्षेत्र ०-१३-६० हे.आर, आकार ३.२६ रू. पै. हि मिळकत तसेच ग्रुप ग्रामपंचायत काशिद तालुका मुरूड, जि. रायगड येथील घर मालमत्ता क्रमांक २७२, क्षेत्र ११५.९८ चौ.मी पक्के घर, सदर वर्णनाच्या दोन्ही मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दत्ताराम सखाराम बेलोसे यांच्याकडून कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेल्या घर व जमिन मिळकती ह्या विद्यमान मालक श्री. दत्ताराम सखाराम बेलोसे यांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक : २८/११/२०२४

सही /-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९२७२६२०००५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे बिडवागळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत श्री. अरविंद महादेव बैकर रा. बदलापूर, जि. ठाणे यांचेसह आमचे अशिल श्री. हिराचंद महादेव बैकर, श्री. नरेंद्र महादेव बैकर, श्रीमती वनमाला रविंद्र बैकर, श्री. सचिन रविंद्र बैकर श्री. संदिप रविंद्र बैकर सर्व रा. मौजे नवखार, पो. कुर्डुस, ता. अलिबाग, जि. रायगड, श्री. मितेश चांगदेव म्हात्रे रा. पालीदेवत, सुकापूर, नविन पनवेल व सौ. मयुरी नंदकुमार ठाकूर रा. पुनाडे, ता. उरण, जि. रायगड यांच्या एकत्र कुटूंबाची व सामाईक ताबेकब्जा वहीवाटीची व फसवणूकीची मिळकत असून तिचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे बिडवागळे, ता. अलिबाग, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | पो.ख (हे.आर.) | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ३१३ | ०-२८-१ | ०-०२-४ | ८.१० |

वरील वर्णनाची मिळकत मुळची बायजूबाई मसण्या बैकर यांचे मालकीची होती. बायजूबाई हयात असताना त्यांचे वारसांमधील तोंडी वाटप व्यवस्थेप्रमाणे सदरची मिळकत त्यांचा मुलगा महादेव मसण्या उर्फ नागू बैकर यांचे हिश्याला देण्यात आलेली होती. बायजूबाई ह्या सुमारे १९७४ सालचे दरम्यान मयत झाल्या, तर महादेव मसण्या उर्फ नागू बैकर हे दि. ०२/०९/१९८१ रोजी मयत झाले. त्यांचे पश्चात त्यांना पत्नी चंद्रभागा महादेव बैकर, मुले- श्री. हिराचंद महादेव बैकर, श्री. रविंद्र महादेव बैकर, श्री. नरेंद्र महादेव बैकर, श्री. अरविंद महादेव बैकर, व मुलगी शैला चांगदेव म्हात्रे असे वारस होते व आहेत. त्यांचे पैकी चंद्रभागा महादेव बैकर या दि. ०६/०४/२००८ रोजी मयत झाल्या. तसेच रविंद्र महादेव बैकर हे ता. १७/१०/२०१८ रोजी मयत झाले. तर शैला चांगदेव म्हात्रे ह्या दि. २९/१०/२०२० रोजी मयत झाल्या. त्यामुळे सदरहू मिळकत वारसाहक्काने आमचे अशिल व श्री. अरविंद महादेव बैकर यांचे सामाईक मालकीची झालेली होती व आहे. मात्र असे असताना श्री. अरविंद महादेव बैकर यांनी कै. चंद्रभागा महादेव बैकर, रविंद्र महादेव बैकर व शैला चांगदेव म्हात्रे हे हयात असताना त्यांना व आमचे अशिल यांना अंधारात ठेवून वरील वर्णनाच्या मिळकतीला, कै. बायजूबाई हिचा मयत मुलगा महादेव मसण्या उर्फ नागू बैकर याचा एकटाच कायदेशीर वारस असल्याचे व त्यांचे शिवाय दुसरे कोणीही अन्य वारस नसल्याची खोटी वर्दी व वारस पंचनामा करून वरील वर्णनाच्या मिळकतीला फेरफार क्र. ३१४ अन्वये एकट्याच्या नावाची नोंद ७/१२ पत्रकी दाखल करून घेतलेली आहे. मात्र सदर मिळकतीमध्ये अरविंद महादेव बैकर यांचा एकट्याचा मालकीहक्क नसून त्यामध्ये आमचे अशिलांचा देखील अविभक्त सामाईक हक्क व हिस्सा होता व आहे. तसेच पुर्वीपासूनच सदरहू मिळकतीवर आमचे अशिलांचा देखील ताबा कब्जा, वहिवाट व फसवणूक होती व आहे.

परंतू ७/१२ पत्रकी एकट्याचे नाव दाखल असल्याचा गैरफायदा घेवून श्री. अरविंद महादेव बैकर यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना अंधारात ठेवून परस्पर विकावयास काढली असल्याची व मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याच्या जोरदार तयारीत असल्याची खात्रीशीर माहिती नुकतीच आमचे अशिलांना प्राप्त झाली आहे. परंतू सदरहू मिळकतीच्या ७/१२ पत्रकी एकट्या अरविंद महादेव बैकर यांचे नाव दाखल असले तरी ते एकटे सदरहू मिळकतीचे मालक कधीही नव्हते व नाहीत. सदरहू मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा देखील अविभक्त हक्क व हिस्सा आणि सामाईक ताबा कब्जा वहिवाट व फसवणूक आहे. त्यामुळे वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत श्री. अरविंद महादेव बैकर यांचे सोबत कोणीही कुठल्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये. याउपरही आमचे अशिलांचे अपरोक्ष त्यांचे हक्क डावलून सदर मिळकतींबाबत कोणताही खरेदी विक्री व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर अजिबात बंधनकारक राहणार नाही. तसेच खरेदीदारास सदर मिळकतींचा ताबा देखील कुठल्याही परिस्थितीत मिळणार नाही. याची याद्वारे सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. २९/११/२०२४

सही/-
**ॲड. राकेश पुंडलिक लाडे**
'श्रीकृपा', भाऊ साहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

## निवडक

### ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांची भेट

**मुंबई :** भारतीय संघाने बॉर्डर गावस्कर चषक मालिकेतील पहिला सामना जिंकल्यानंतर संघ आता दोन दिवसीय सराव सामना खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. हा सराव सामना ३० नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान होणार आहे. या सराव सामन्यापूर्वी भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांची भेट घेतली आहे. यावेळी ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा, उपकर्णधार जसप्रीत बुमराह आणि दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहलीशी खास संवाद साधला आहे.

### पांड्याची दमदार खेळी

**मुंबई :** सय्यद मुश्ताक अली चषक स्पर्धेतील बरोडाविरूद्ध तमिळनाडू सामना फारच अटीतटीचा झाला. दोन्ही संघातील फलंदाजांनी सामन्यात आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन केले. प्रथम फलंदाजी करत तमिळनाडूने बडोद्याला २२२ धावांचे आवाहन दिले. ज्यामध्ये विजय शंकरने हार्दिक पांड्याच्या गोलंदाजीवर ३ षटकार लगावत एका षटकात १९ धावा केल्या. प्रत्युत्तरात पांड्याने गुरजनप्रीत सिंगच्या गोलंदाजीवर ४ षटकार व १ चौकार ठोकत तब्बल २९ धावा कुटल्या. या रोमांचक लढतीत शेवटच्या क्षणी बडोद्याने बाजी मारली.

### आयुष शिंदेचे द्वीशतक

**मुंबई :** हॅरिस शिल्ड आंतरशालेय स्पर्धेत नाबाद ४१९ धावांची खेळी करून चर्चेत आलेल्या आयुष शिंदेने पुन्हा मैदान गाजवले आहे. जनरल एज्युकेशन अकादमी चेंबूर संघाचा कर्णधार असलेल्या आयुषने गुरुवारी अंजुमन ए इस्लाम हायस्कूलच्या गोलंदाजांची धुलाई केली. त्याच्या द्विशतकाच्या जोरावर चेंबूरच्या संघाने पहिला डाव ६ बाद ३५७ धावांवर घोषित केला. पहिल्या दिवसाच्या अखेरीस अंजुनम इस्लाम संघाने बिनबाद १८ धावा केल्या असून ते आणखी ३३९ धावांनी पिछाडीवर आहे.

### सामना खेळताना निधन

**छ. संभाजीनगर :** सिडको गरवारे मैदानावर बुधवारी (दि.२७) सायंकाळी सुरू असलेल्या एका सामन्यादरम्यान शहरातील प्रसिद्ध क्रिकेटपटू इमरान पटेल (३५) यांचे तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. सामना खेळत असताना मैदानावरच ते कोसळले. त्यांच्या निधनामुळे क्रिकेट क्षेत्रात मोठी शोककळा पसरली आहे. गरवारेच्या मैदानावर क्रिकेटच्या स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेदरम्यान बुधवारी सायंकाळी सहा वाजता यंग एलेव्हन विरुद्ध लकी बिल्डर यांच्यात सामना सुरू होता.

### 'इतर खेळावंर अन्याय नाही'

**नवी दिल्ली :** क्रिकेट हा खेळ भारतात कमालीचा लोकप्रिय आणि प्रभाव असलेला खेळ आहे. परंतु, हा खेळ इतर खेळांच्या प्रगतीत अडथळा आणणारा नाही. त्यामुळेच नीरज चोप्रासारखे खेळाडू नावलौकित मिळवू शकले, असे स्पष्ट मत विश्व ॲथलेटिक्सचे प्रमुख सेबास्टिन को यांनी व्यक्त केले आहे. पुढील वर्षी होत असलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या अध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी को हे उमेदवार असणार आहेत. गेल्या दोन दिवसांपासून ते भारतात असून पंतप्रधान मोदी यांची भेट घेणार आहेत.

# डी गुकेशची शानदार खेळी

## गतविजेत्या डिंग लिरेनला पराभवाचा धक्का

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
**भारतीय ग्रँडमास्टर डी गुकेशने शानदार खेळ करून विश्वअजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेन याला तिसऱ्या फेरीत पराभवाचा धक्का दिला आहे. तसेच, १.५०-१.५० अशी बरोबरी देखील साधली आहे. या स्पर्धेच्या सलामीला पहिल्या डावात काळ्या मोहऱ्यांसह खेळताना चुका केल्यामुळे पराभव सहन करावा लागलेल्या गुकेशने तिसऱ्या डावासाठी कमालीची तयारी केल्याचे दिसून आले. मुळात चालीसाठी वेळेवर त्याचे नियंत्रण होते. त्याचवेळी लिरेन एकेक चाल करण्यासाठी बराच वेळ घेत होता.**



तेराव्या चालीपर्यंत गुकेश घड्याळानुसार एक तास पुढे होता. जेथे लिरेनने एक, सात, सहा मिनिटे घेतली तेथे गुकेशने केवळ चार मिनिटांत चाली केल्या होत्या. १२० मिनिटांच्या निर्धारित वेळेत ४० चाली करायच्या असताना गुकेशने निर्विवाद वर्चस्व मिळवले होते. यावेळी भारताच्या अर्जुन एरिगिसीविरुद्ध विश्वविजेत्या व्लादिमीर क्रामनिकने केलेल्या चाली गुकेशने केल्या. त्या सामन्यात एरिगिसीने कशीबशी बरोबरी साधण्यास यश मिळवले होते; पण गुकेशने अधिक आक्रमक चाली करून लिरेनला चुका करण्यास भाग पाडले.

लिरेन याचा उंट गुकेशने अगोदरच संकटात आणला होता. त्यानंतर दोन प्याद्यांच्या मोबदल्यात उंट टिपल्यानंतर डावाच्या मध्यावर डी गुकेशची स्थिती मजबूत होत गेली. आपण उलटवार करू शकतो, असा विचार लिरेन यावेळी करत होता; परंतु त्याच्या प्रत्येक चालीला गुकेशने चोख प्रत्युत्तर दिले. वेळेचे गणित न जमवू शकलेल्या लिरेनला अखेरच्या नऊ चाली करण्यासाठी केवळ दोन मिनिटांचा अवधीच शिल्लक होता. त्यावेळी गुकेशने डावावरची पकड अधिक घट्ट केली होती.

कमालीचा अस्थिर झालेल्या लिरेनला अखेरच्या चालींसाठी केवळ १० सेकंदच उरली होती. ३७ चालीनंतर त्याच्याकडे वेळच उरलेला नसल्यामुळे गुकेशच्या नावावर पहिला विजय झळकला.

> **या विजयाचा आनंद निश्चितच आहे. गेल्या दोन डावांतील खेळावर मी समाधानी आहे. आजच्या दिवसातील खेळ फारच चांगला होता. बोर्डवर येताच आत्मविश्वास वाढलेला होता. प्रतिस्पर्धी खेळाडूला नामोहरम करताना आपला विश्वास अधिक वाढत असतो.**
> **-डी गुकेश, भारतीय ग्रँडमास्टर**

## प्रो-कबड्डीचा अंतिम सामना पुण्यात



**। पुणे । प्रतिनिधी ।**
यंदाच्या प्रो-कबड्डी लीगच्या बाद फेरीच्या लढती आणि अंतिम सामना पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉल येथे २६ ते २९ डिसेंबर दरम्यान होणार आहेत. प्रो कबड्डी लीग टप्प्यातील अव्वल दोन संघ थेट उपांत्य फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या स्थानावरील संघ २६ डिसेंबर रोजी एलिमिनेटर टप्प्यात आमनेसामने येतील. यावेळी तिसऱ्या क्रमांकावर येणारा संघ एलिमिनेटर १ मध्ये सहाव्या स्थानावर असलेल्या संघाशी खेळेल. तर, चौथ्या स्थानावरील संघ पाचव्या स्थानावरील संघाशी एलिमिनेटर २ मध्ये खेळणार आहे.

एलिमिनेटर १चा विजेता उपांत्य फेरीत गुणतालिकेतील अव्वल स्थानावर असणाऱ्या संघाशी खेळेल. तर, एलिमिनेटर २चा विजेता दुसऱ्या उपांत्य फेरीत गुणतालिकेतील दुसऱ्या स्थानावरील संघाशी खेळणार आहे. या दोन्ही उपांत्य लढती २७ डिसेंबर रोजी खेळवल्या जाणार आहेत. त्यानंतर अंतिम लढत २९ डिसेंबर रोजी होणार आहे. लीगचा दुसरा टप्पा सध्या नोएडा येथे सुरु असून हा टप्पा १ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. त्यानंतर ३ ते २४ डिसेंबर दरम्यान अखेरचा टप्पा पुण्यातच खेळविला जाणार आहे.



● माणगावातील राजिप खांदाड शाळेत आयोजित केलेल्या केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे उद्घाटन गुरुवारी (दि.२८) करण्यात आले. राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार व माणगाव पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी ग्रामपंचायत सदस्य काशीराम पवार, पोलीस पाटील नथुराम पवार, संतोष मांजरे, ग्रामस्थ तसेच शिक्षक वर्ग उपस्थित होते.

# युवा क्लबकडून पदकांची लयलुट

## ६ सुवर्ण, २ रौप्य, ७ कांस्यपदके

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने तायक्वांदो असो. ऑफ महाराष्ट्र यांच्यावतीने जळगाव तायक्वांदो असो. संयोजित येथील छ. शिवाजी महाराज स्टेडियम येथे १०व्या राज्यस्तरीय तायक्वांदो फाईट व पुमसे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत रत्नागिरीतील युवा मार्शल आर्ट तायक्वांदो ट्रेनिंग सेंटरमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या खेळाडूंनी क्योरुग व पूमसे स्पर्धेत ६ सुवर्ण, २ रौप्य तर ७ कांस्यपदके पटकावली असून रत्नागिरी जिल्ह्याचा संघ उपविजेता ठरला आहे.



संघाचे प्रशिक्षक म्हणून अमित रेवत, कुमार जाधव व महिला प्रशिक्षिका शशिरेखा कररा यांनी यशस्वीरित्या काम पाहिले. विजेत्या सर्व खेळाडूंना रत्नागिरी तायक्वांदो स्पोर्ट्स असो.चे अध्यक्ष व्यंकटेश्वर राव करा, उपाध्यक्ष शैलेश गायकवाड, विश्वदास लोखंडे आदींनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

### विजेते खेळाडूंची नावे

सुवर्णपदकः मंथन आंबेकर, सार्थक गमरे, अस्मि साळुंखे, ओवी काळे, रुहि करारा, आराध्य तहसीलदार.
रौप्यपदकः देवांश गराटे, मंथन आंबेकर.
कांस्यपदकः सोनाक्षी रहाटे, उत्कर्ष शेट्ये, अरहा आयरे, अस्मि साळुंखे, सार्थक गमरे, आराध्य तहसीलदार, ओवी काळे.

# बॅडमिंटनपटू ॲल्फीला सुवर्णपदक

**। ठाणे । प्रतिनिधी ।**
खुल्या राज्य बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत ठाणेकर बॅडमिंटनपटू चिमुरड्या ॲल्फी मेकडनाथ हिने सुवर्णपदक तर मिश्र दुहेरीत इशिता कोरगावकर हिने रौप्य पदकाची कमाई केली आहे. मुंबई येथील एनएससीआय येथे नुकत्याच पार पडलेल्या योनेक्स सनराइज् राज्यस्तरीय खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत ठाणेकर बॅडमिंटनपटूंनी विविध वयोगटांमध्ये पदकांची लयलूट केली आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेत एकूण २१ विविध गटांमध्ये संपूर्ण राज्यभरातून सुमारे ९०० प्रवेशिका नोंदवल्या गेल्या होत्या.



ॲल्फी मेकडनाथ या चिमुकल्या खेळाडूने या हंगामातील लागोपाठ दुसरे राज्य अजिंक्यपद पटकावण्याची किमया साध्य केली आहे. अकरा वर्षाखालील गटात पहिल्या सामन्यापासूनच प्रभुत्व सिद्ध करीत ॲल्फीने दुसरे नामांकन प्राप्त तर केलेच, परंतु सर्व प्रतिस्पर्धी खेळाडूंचा एक हाती पराभव करीत उपउपांत्य फेरीत धडक देखील मारली. उपउपांत्य फेरीत ॲल्फीने अजिंक्य देसाई या खेळाडूचा पराभव करीत उपांत्य फेरीत आपली जागा निश्चित केली. तर उपांत्य फेरीत आदिराज शेट्टीचा ॲल्फीने पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीच्या रोमहर्षक सामन्यात ॲल्फीने अर्हम भंडारीचा पराभव करीत आपल्या कारकीर्दीतील लागोपाठ दुसरे राज्यस्तरीय सुवर्णपदक पटकावले. मिश्र दुहेरीत इशिता कोरगावकर हिने रौप्य पदक पटकावले आहे.

# उपांत्यफेरीत उत्कंठावर्धक लढती

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
सरस्वती मंदिर हायस्कूलच्या अमृत मोहत्सवी वर्षानिमित्त आंतरशालेय लंगडी व खो-खो स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दुसऱ्या दिवशी मुलांचे सामने झाले. यावेळी स्पर्धेतील दोन्ही उपांत्यफेरीत उत्कंठावर्धक लढती पाहायला मिळाल्या. या सामन्यांमधून सरस्वती मंदिर हायस्कूल आणि श्री गणेश विद्यालयाने आपापले सामने जिंकून अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. पहिल्या उपांत्य फेरी सामन्यात सरस्वती मंदिर हायस्कूलने अहिल्या विद्या मंदिरचा १९ गुणांनी पराभव केला. तर, दुसऱ्या उपांत्य फेरी सामन्यात श्री गणेश विद्यालयाने वाडीबंदर मुंबई पब्लिक स्कूलचा ११ गुणांनी पराभव केला आहे.



### सरस्वतीकडून प्रभावी खेळ

या सामन्यात सरस्वतीकडून हर्ष प्रजापती, शिवम झा व श्रेयस जावळे यांनी केलेल्या खेळामुळे सरस्वती मंदिर हायस्कूलचा संघ अंतिम सामन्यात स्थान मिळवण्यात यशस्वी ठरला. तर, पराभूत अहिल्या विद्या मंदिरच्या विश्वेश गुलगुले, मुझम्मील शाह यांनी केलेली खेळी त्यांना पराभवापासून वाचवू शकली नाही.

### श्री गणेशकडून उत्कृष्ट खेळ

श्री गणेश विद्यालयाच्या मानस पोस्टरे, संयम धाडवे, अमेय मोहिते यांनी विजयात मोठी कामगिरी करत श्री गणेश विद्यालयाला अंतिम फेरीत स्थान मिळवून दिले. तर, पराभूत वाडीबंदर मुंबई पब्लिक स्कूलच्या प्रविण गुप्ता, ऋषी ठाकूर यांनी चांगला खेळ केला. परंतु, त्यांना इतरांची साथ लाभली नाही. त्यामुळे त्यांना मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

# सिंधू, सेन दुसऱ्या फेरीत दाखल



**। लखनौ । प्रतिनिधी ।**
सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत दाखल होताना अव्वल मानांकित पी. व्ही. सिंधू हिने महिला एकेरीत, तर लक्ष्य सेन याने पुरुष एकेरीत सरळ गेममध्ये आकर्षक विजय नोंदविले आहेत. ऑलिंपिक पदकविजेत्या सिंधूने उदयोन्मुख खेळाडू अनमोल खरबला २१-१७, २१-१५ अशा फरकाने नमविले. या स्पर्धेत सिंधू दोन वर्षांनंतर सहभागी झाली आहे. आता दुसऱ्या फेरीत तिच्यासमोर ईरा शर्मा हिचे आव्हान असेल. तर, जागतिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकलेल्या लक्ष्य सेन याने पहिल्या फेरीतील लढतीत मलेशियाच्या शोलेह ऐदिली याला २१-१२, २१-१२ असे पराजित केले आहे. स्पर्धेच्या पुरुष एकेरीत किरण जॉर्ज, आयुष शेट्टी, मेईराबा लुवांग मैस्नाम यांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला, तर महिला एकेरीत मालविका बनसोड, अनुपमा उपाध्याय, ईशाराणी बरुआ, देविका सिहाग, उन्नती हुडा, तस्निम मिर, श्रीयांशी वलीशेट्टी यांनीही पुढील फेरी गाठली आहे.

> **दोन वर्षांनंतर या स्पर्धेत खेळताना मला आनंद झालेला आहे. दुखापतीमुळे गतवर्षी मी येथे खेळू शकले नाही. आता घरच्या मैदानावर पुन्हा एकदा खेळताना भावना अवर्णनीय आहे. पहिल्या सामन्यात खेळताना मी काही चुका केल्या; पण एकंदरीत कामगिरीवर खूश आहे.**
> **- पी.व्ही. सिंधू**

> **घरच्या चाहत्यांसमोर खेळताना खूप छान वाटते. याठिकाणी मी यापूर्वीही खेळलो आहे. आता पुढील लढतीवर लक्ष एकवटले आहे. बीडब्ल्यूएफ स्पर्धा आणि जागतिक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्याचा माझा निर्धार आहे. - लक्ष सेन**

## राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

# महाराष्ट्राची बाद फेरीत धडक

**। अलिगड । क्रीडा प्रतिनिधी ।**
महाराष्ट्राच्या मुला-मुलींच्या संघाने ४३व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत प्रभावी कामगिरी करत बाद फेरीत प्रवेश केला आहे. बाद फेरीत महाराष्ट्राच्या मुली छत्तीसगड सोबत तर मुले कोल्हापूर सोबत लढणार आहेत.

अलिगड (उत्तरप्रदेश) येथील महाराणी अहिल्याबाई होळकर स्पोर्टस स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत शेवटच्या साखळी सामन्यात भरतसिंग वसावेने व आशिश गौतम यांच्या अष्टपैलू खेळीमुळे महाराष्ट्राच्या मुलांनी पुद्देचरीवर ३९-२४



असा एक डाव राखून १५ गुणांनी दणदणीत विजय मिळविला आहे. जितेंद्र वसावे व सोत्या वळवी यांनी आपल्या धारदार आक्रमणात प्रत्येकी ८ गडी बाद करीत त्यांना साथ दिली. पुद्देचरीकडून स्टेफनन ६ गडी बाद केले.

महाराष्ट्राच्या मुलींच्या शेवटच्या साखळी सामन्यात यजमान उत्तरप्रदेशचा २८-५ असा एक डाव २३ गुणांनी धुव्वा उडविला आहे. स्नेहा लामकाने, प्रतीक्षा बिराजदार हे त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. उत्तरप्रदेशच्या मानसीने अष्टपैलू खेळी करीत लढत दिली.

**बाद फेरीचे सामने:**
**मुलींचे: महाराष्ट्र विरुद्ध छत्तीसगड**
**मुलांचे: महाराष्ट्र विरुद्ध कोल्हापूर**

**कोल्हापूर, विदर्भचा बाद फेरीत प्रवेश**
**कोल्हापूरच्या आणि विदर्भच्या मुले व मुलींच्या संघानेही बाद फेरी गाठली आहे. मुलींमध्ये कोल्हापूर विरुद्ध विदर्भ, मुलांमध्ये कोल्हापूर विरुद्ध महाराष्ट्र आणि विदर्भ विरुद्ध ओडीसा असे बाद फेरीचे सामने होणार आहेत.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)